दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

### आजचे पंचांग

शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, फाल्गुन मास, शुक्लपक्ष, एकादशी रात्री १०-३३ पर्यंत दिवस नक्षत्र– आर्द्रा सकाळी १०-४९ पर्यंत योग– आयुष्मान् संध्याकाळी ७-४४ पर्यंत
आज आमलकी एकादशी आहे

### हनुमंत पवार यांना संरक्षण

**पुणे** : काँग्रेसचे प्रवक्ते हनुमंत पवार यांना पुणे पोलिसांकडून पोलीस संरक्षण देण्यात आले आहे. स्वारगेट परिसरात एका दैनिकाच्या कार्यालयाबाहेर झालेल्या मारहाणीच्या घटनेनंतर हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. २३ फेब्रुवारी रोजी हिंदुत्ववादी कार्यकर्ता तुषार दामगुडे आणि त्याच्या साथीदारांनी हनुमंत पवार यांना मारहाण केल्याचा प्रकार घडला होता. या घटनेची राज्यभर चर्चा झाली होती. घटनेनंतर हनुमंत पवार यांनी तक्रार दाखल केली होती.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १५५ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### सरन्यायाधीश १ मार्च रोजी आंध्रमध्ये

**मछलीपटणम (आंध्र प्रदेश) :** सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत १ मार्च रोजी एनटीआर आणि गुंटूर जिल्ह्यांमधील विकास कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी आंध्र प्रदेशला भेट देतील. भारताचे सरन्यायाधीश १ मार्च रोजी दुपारी गन्नवरम विमानतळावर पोहोचतील. "भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत १ मार्च रोजी कृष्णा जिल्ह्यातील गन्नवरम विमानतळावर पोहोचणार आहेत," असे एका अधिकृत प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

### दिल्लीत उद्यानांसाठी १०.२ कोटी रुपये

**नवी दिल्ली :** आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये २० जानेवारीपर्यंत राष्ट्रीय राजधानीतील १,५६६ उद्यानांना दिल्ली पार्क्स अँड गार्डन्स सोसायटीकडून १०.२२ कोटी रुपयांची आर्थिक मदत मिळाली आहे, असे एका माहिती अधिकाराच्या उत्तरात म्हटले आहे. माहिती अधिकार अर्जाला उत्तर देताना, डीपीजीएसने एकूण १४.१८ कोटी रुपये किंवा या कालावधीसाठी वाटप केलेल्या २० कोटी रुपयांपैकी सुमारे ७० टक्के रक्कम वापरली आहे. ३४३ निवासी कल्याण संघटना (आरडब्ल्यूए) आणि इतर स्थानिक संस्थांद्वारे व्यवस्थापित केलेल्या अनेक उद्यानांना डीपीजीएस मदतीचा फायदा झाला.

### रांचीमध्ये ड्रग्जसह दोघांना अटक

**रांची :** येथे ८ लाख किमतीच्या १.७४ ग्रॅम एलएसडीसह दोघांना अटक करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी गुरुवारी दिली. डार्क वेबचा वापर करून हे खेप नेदरलँड्सहून पोस्टाने आयात करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. "रांचीमध्ये पहिल्यांदाच लायसर्जिक ॲसिड डायथिलामाइड (एलएसडी) हे अर्ध-कृत्रिम औषध जप्त करण्यात आले आहे.

## हिंदीसक्ती, दावोस, टिपू सुलतान ते अर्थव्यवस्था

# मुख्यमंत्र्यांनी भाषणात 'सगळंच' काढलं..!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांच्या अभिभाषणावर सभागृहात चर्चा केली. यावेळी, राज्यातील विविध मुद्द्यांवर त्यांनी आपली भूमिका मांडली. त्यामध्ये, टीपू सुलताना, दावोस करार, विरोधकांचे आरोप, एबीसीची रेड, नरहरी झिरवाळ प्रकरण, मराठी शाळा, हिंदी-मराठी भाषेसह अनेक विषयांवर चर्चा केली.

विरोधी पक्ष हा भ्रमित आणि संभ्रमित आहे, असे दिसते. माझी त्यांना सूचना आहे की, भ्रमात राहून धावण्यापेक्षा संभ्रमातून बाहेर पडण्यासाठी शांतपणे विचार करुन मुद्दे मांडले पाहिजेत. ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था, विकसित भारत, महाराष्ट्राची वाटचाल, दावोस करारासंदर्भातही स्पष्टीकरण दिले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, चांगल्याला चांगलं म्हणायला शिका. विरोधी पक्षाने चहापानपासून राजकारण करायला सुरुवात केली. हम नही सुधरेंगे असं ते आहे. महाराष्ट्रात मराठीच अनिवार्य आहे. मराठी शाळा बंद पडल्या नाहीत, ८४ टक्के शाळा मराठी माध्यमांच्या आहेत, ६९ टक्के विद्यार्थी मराठी शिकत आहेत. मराठी शाळा बंद पडल्याची माहिती कपोलकल्पित आहे, असेही फडणवीसांनी सांगितले. कुंभमेळ्यामुळे यूपीचे ब्रँडिंग हे जगात झाले, आपल्याला ही कुंभमेळ्यातून जगात महाराष्ट्राचे ब्रँडिंग करायचे आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे, ती जोपासायची आहे, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले. नवीन शैक्षणिक धोरणासाठी २१ सप्टेंबर २०२० साली मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी समिती नेमली, त्यात वेगवेगळे कुलगुरू होते, शिक्षणतज्ज्ञ होते. विजय कदम हे महत्त्वाचे नाव आहे, ते ठाकरे सेनेचे नेते पण आहेत. या कमिटीत १६ लोक मराठी होते. या समितीने उद्धव साहेबांकडे अहवाल दिला. त्यावर उद्धवजींनी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले. १५ सप्टेंबर २०२१ रोजी यावर बातम्या झाल्या. बदलत्या काळात या शिफारसीनुसार, महाराष्ट्राला शैक्षणिकदृष्ट्या प्रगतीपथावर ठेवण्यासाठी या शिफारसी गरजेच्या आहेत, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. या शिफारसमध्ये इंग्रजी व हिंदी भाषा ही दुसरी भाषा म्हणून पहिल्या वर्षापासून लागू करावी असे म्हटलंय. १४ सप्टेंबर २०२१ रोजी अहवाल सादर झाला. २० सप्टेंबर रोजी तो मंत्रिमंडळात ठेवला. डॉ. माशेलकर समितीचा अहवाल मुख्यमंत्र्यांनी वाचून दाखवला. तसेच, यावर सही कुणाची? आदित्य सांगतील ना? मंत्री कोणीही असू द्या असे म्हणत मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना कोंडीत पकडले. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था गेल्या ११ वर्षांत तिपटीने वाढल्याचा दावा देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधानसभेत केला. विरोधकांवर दिशाभूल केल्याचा आरोप करत राज्य दिवाळखोरीत निघाल्याचा दावा फेटाळून लावला. २०१२-१३ साली राज्याची अर्थव्यवस्था १३ लाख कोटी रुपयांची होती. ती आता ५१ लाख कोटी रुपयांवर पोहोचली असून पुढील टप्पा ९० लाख कोटींचा असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्राने ६६० बिलियन डॉलरचा टप्पा पार केला असून इतर कोणतेही राज्य अर्थव्यवस्थेच्या बाबतीत इतके पुढे नसल्याचे त्यांनी नमूद केले.

# अजितदादांच्या वारसाची धुरा सुनेत्राताईंकडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** मुंबईत झालेल्या बैठकीत अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षाच्या पुढील नेतृत्वाबाबत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांनी भावनिक शब्दांत अजित पवारांच्या आठवणींना उजाळा देत, त्यांच्या जाण्याने पक्षाचे मोठे नुकसान झाल्याचे सांगितले.

बैठकीत सुनेत्रा पवार यांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव प्रफुल पटेल यांनी राष्ट्रीय कार्यकारिणीत मांडला आणि उपस्थित सर्व सदस्यांनी हात उंचावून त्यास मान्यता दिली. "सुनेत्राताईंच्या नेतृत्वाखाली पक्षाची वाटचाल सुरू राहील," असा विश्वास पटेल यांनी व्यक्त केला. या बैठकीस सुनील तटकरे, पार्थ पवार, रुपाली चाकणकर आणि छगन भुजबळ यांच्यासह विविध राज्यांतील पदाधिकारी उपस्थित होते. पार्थ पवार यांच्याकडेही पक्षात मोठी जबाबदारी सोपवली जाणार असल्याची माहिती देण्यात आली.

प्रफुल पटेल यांनी भाषणात नमूद केले की, गेल्या काही आठवड्यांत पक्षाबाहेरील काही व्यक्तींनी विविध वक्तव्ये केली; मात्र योग्य वेळी योग्य निर्णय घेण्यात आला. सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रीपदी नेमण्याचा निर्णय हा पक्षाच्या एकतेचा आणि स्थैर्याचा भाग होता, असे त्यांनी सांगितले.

# अधिकृत आधार केंद्र आता गुगल मॅपवर
## यूआयडीएआय आणि गुगलची भागीदारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अधिकृत आधार केंद्रांची माहिती आता गुगल मॅपवर पाहायला मिळणार आहे. आता जवळच्या आधार केंद्राचा पत्ता आणि उपलब्ध सेवा गुगल मॅपवर सापडतील. अधिकृत आधार केंद्रे गुगल मॅप्सवर प्रदर्शित करण्यासाठी युनिक आयडेंटिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडिया आणि गुगलने भागीदारी केली आहे.

गुगल आणि यूआयडीएआयमधील सहकार्याच्या पुढील टप्प्यात यूआयडीएआय केंद्राची माहिती व्यवस्थापित करण्यासाठी आणि लोकांच्या अभिप्रायाला थेट प्रतिसाद देण्यासाठी गुगल व्यवसाय प्रोफाइलचा वापर करेल. भविष्यात, भागिदारी गुग नकाशे इंटरफेसद्वारे थेट अपॉइंटमेंट बुकिंग करता येईल.गुगल आणि यूआयडीएआय यांच्याकडून भागीदारी केल्यानंतर अधिकृत आधार केंद्र गुगल मॅपवर दिसतील. यामुळं देशभातील नागरिकांना अधिकृत आधार केंद्रांची माहिती सहजपणे मिळेल. आधार केंद्रांकडून ज्या प्रकारच्या सेवा दिल्या जातात, त्यानुसार आधार केंद्रांची माहिती गुगल मॅपवर दिसेल. लहान मुलांची नोंदणी, प्रौढ नागरिकांची नोंदणी, फक्त पत्ता अपडेट करणं, मोबाईल क्रमांक अपडेट करणं यानुसार माहिती गुगल मॅपवर दिसेल. दिव्यांगांच्या सोयींची उपलब्धता, इन्फ्रास्ट्रक्चर, पार्किंग सुविधा, कामाचे तास याबाबतची माहिती गॅगल मॅपवर उपलब्ध असेल. याबाबतच्या सुविधा येत्या काही दिवसात गुगल मॅपवर दिसतील.देशभरामधील ६० हजार आधार सेवा केंद्र गुगल मॅपवर असतील.

## महाराष्ट्रातील खळबळजनक आकडे सभागृहात सादर

# राज्यातून रोज सरासरी १३२ महिला बेपत्ता

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राज्यातील महिला आणि बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. एका वर्षात तब्बल ४८,२७८ महिला बेपत्ता झाल्याची माहिती विधानसभेत समोर आली असून, दररोज सरासरी १३२ महिलांच्या बेपत्ता होण्याचा हा आकडा चिंताजनक आहे. ही माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरातून दिली.

२०२४ मध्ये राज्यात ४५,६६२ महिला बेपत्ता झाल्या होत्या. २०२५ मध्ये हा आकडा वाढून ४८,२७८ वर पोहोचला आहे. म्हणजेच एका वर्षात सुमारे २,६०० प्रकरणांची वाढ झाली आहे. बेपत्ता महिलांपैकी २०२४ मध्ये ३०,८७७ महिलांचा शोध लागला होता, तर २०२५ मध्ये ३६,५८१ महिलांचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले. तरीही हजारो महिला अद्याप बेपत्ता असल्याचे स्पष्ट होते.

मुंबई, नवी मुंबई, रायगड, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या पाच ठिकाणी अल्पवयीन मुले-मुली बेपत्ता होण्याचे प्रमाण अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे. २०२४ ते २०२५ या कालावधीत या पाच जिल्ह्यांत एकूण ४,९८९ बालके हरवल्याची नोंद आहे. त्यापैकी ४,८१३ बालकांचा शोध लागला आहे. १४ ते १८ वयोगटातील मुलांच्या शोधाचे प्रमाण ९६ टक्क्यांपेक्षा जास्त असल्याचे सांगितले गेले.

महिला आणि बालकांच्या बेपत्ता होण्यामागील कारणांमध्ये कौटुंबिक तणाव, मानवी तस्करी, प्रेमसंबंधातून घर सोडणे, रोजगारासाठी स्थलांतर आणि सोशल मीडियाद्वारे होणारी फसवणूक अशी विविध कारणे समोर येत आहेत. मात्र, सर्वच प्रकरणे एकाच चौकटीत बसत नाहीत, हेही वास्तव आहे.

बेपत्ता व शोषित मुलांचा शोध घेण्यासाठी राज्यात 'ऑपरेशन मुस्कान' राबवले जाते. २०१५ पासून डिसेंबर २०२४ पर्यंत १३ वेळा ही मोहीम राबवण्यात आली आहे. या मोहिमेद्वारे अनेक मुलांना त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचवण्यात यश मिळाल्याचा दावा सरकारकडून करण्यात आला आहे. यंदाही ही मोहीम सुरू असल्याचे स्पष्ट करण्यात आले. महिला व मोठ्या मुलांबरोबरच नवजात बालकांच्या सुरक्षेचाही प्रश्न गंभीर ठरत आहे. मुंबई, ठाणे, पुणे आणि पिंपरी चिंचवड येथे नवजात बालकांच्या विक्रीप्रकरणी पाच गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. मानवी तस्करीशी संबंधित टोळ्यांविरुद्ध पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे.

दररोज १३२ महिलांच्या बेपत्ता होण्याचा सरासरी आकडा हा केवळ सांख्यिकीय मुद्दा नाही; तो कायदा-सुव्यवस्थेच्या आराखड्यावरील प्रश्न आहे. तक्रार नोंदणीची गती, शोध मोहिमांची कार्यक्षमता, सायबर ट्रॅकिंग, आंतरराज्य समन्वय आणि पीडितांच्या पुनर्वसनाची प्रणाली यांचे पुनरावलोकन करणे आवश्यक आहे.

महिला सुरक्षिततेसाठी केवळ मोहिमा पुरेशा ठरत नाहीत. प्रतिबंधात्मक उपाययोजना, संवेदनशील पोलिसिंग, स्थानिक पातळीवरील सामाजिक जागरूकता आणि तंत्रज्ञानाधारित तपास यांचा एकत्रित वापर झाल्यासच या वाढत्या प्रवृत्तीला आळा बसू शकतो.

# घातपात आढळल्यास गुन्हा दाखल
## अजित पवार विमान दुर्घटना प्रकरणी सीआयडीचा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** अजित पवारांच्या विमान अपघाताची चौकशी करण्याची मागणी सर्व स्तरांतून होत आहे. आमदार रोहित पवार यांनीही यासंदर्भात मागणी केली आहे. त्यांनी व्हीएसआर विमान कंपनीवर गुन्हा दाखल करण्यासाठी आक्रमक पवित्रा घेतला आहे.

दरम्यान, आज अजित पवारांच्या विमान अपघाताच्या तपासप्रकरणी पुण्यात सीआयडीने पत्रकार परिषद घेतली. यावेळी सीआयडी अधिकाऱ्यांनी अजित पवार यांच्या विमान अपघाताचा तपास योग्य दिशेने सुरू आहे; तपासात घातपात आढळल्यास गुन्हा दाखल करण्यात येईल असे स्पष्ट केले.

बारामती येथील विमान दुर्घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन विमानातील अजित पवार व अन्य व्यक्तींच्या आकस्मिक मृत्यूचा तपास पोलिस स्टेशन बारामती येथे कलम १९४ बीएनएसएस अंतर्गत नोंद करण्यात आला होता. त्यानंतर हा तपास पोलिस महासंचालकांनी सीआयडीकडे वर्ग केला आहे. सध्या हा तपास सीआयडी करत आहे. सदर तपास पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या मृत्यूमागे घातपात आहे का, हा तपासाचा मुख्य उद्देश आहे. त्यानंतर गुन्हेगारी निष्काळजीपणा आहे का, हा तपासाचा भाग आहे. तिसरा मुद्दा म्हणजे या प्रकरणात कोणते गुन्हेगारी कृत्य घडले आहे का, हेही तपासले जात आहे. वरील सर्व बाबींच्या अनुषंगाने या प्रकरणाचा तपास सुरू आहे. या अपघाताच्या पहिल्या क्षणापासून आतापर्यंत तपास अतिशय प्रोफेशनल पद्धतीने आणि योग्य दिशेने सुरू आहे. बारामतीतील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील फॉरेन्सिक विभाग, पुण्यातील फॉरेन्सिक सायन्स लॅब, एव्हिएशन ऑथॉरिटी, इतर संबंधित एजन्सी तसेच केंद्रातील अनेक संस्था या तपासात सहकार्य करत आहेत. एएआयबी यांच्याशी सीआयडीचा सातत्याने संपर्क असून त्यांचाही तपास सुरू आहे. थोडक्यात, या तपासामध्ये घातपात, गुन्हेगारी निष्काळजीपणा किंवा अन्य गुन्हेगारी कृत्य निष्पन्न झाल्यास योग्य त्या कलमांखाली सीआयडी गुन्हा दाखल करून पुढील तपास पूर्ण करेल आणि न्यायालयात अभियोग चालवेल, असे सीआयडी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

### मार्चसाठी २२.५० लाख मेट्रिक टन साखरेचा कोटा

**पुणे :** केंद्र सरकारने मार्च महिन्यासाठी २२ लाख ५० हजार मेट्रिक टन साखरेचा कोटा जाहीर केला आहे. वाढता उन्हाळा, शीतपेय उत्पादकांची वाढती मागणी, यात्रा-जत्रा आणि लग्नसराईचा हंगाम लक्षात घेता साखरेची मागणी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, जाहीर झालेला कोटा अपेक्षेपेक्षा कमी असल्याची धारणा घाऊक बाजारपेठेत व्यक्त होत आहे. फेब्रुवारी महिन्यात २८ दिवसांसाठी २२.५० लाख मेट्रिक टन कोटा देण्यात आला होता. मार्चमध्ये ३१ दिवस असूनही तेवढाच कोटा कायम ठेवण्यात आल्याने पुरवठा तुलनेने कमी पडू शकतो, असे व्यापाऱ्यांचे मत आहे.

# भ्रष्टाचारासंबंधीचा धडा वगळणार
## आठवीच्या पुस्तकाची विक्री थांबवली?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग अर्थात एनसीईआरटीने प्रकाशित केलेल्या इयत्ता आठवीच्या सामाजिक शास्त्राच्या पाठ्यपुस्तकातील एका धड्यावरून वाद निर्माण झाला आहे. इयत्ता आठवीच्या पुस्तकात 'समाजातील न्यायपालिकेची भूमिका' या धड्याचा समावेश करण्यात आला असून यामध्ये 'न्यायपालिकेतील भ्रष्टाचार' या विषयाचा समावेश करण्यात आल्याने गोंधळ उडाला आहे.

याबाबत सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी देखील तीव्र आक्षेप घेत नाराजी व्यक्त केली आहे. 'कोणालाही संस्थेची (न्यायपालिका) बदनामी करू देणार नाही', असं सूचक भाष्य करत सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी आपली नाराजी व्यक्त केली.

दरम्यान, एनसीईआरटीच्या आठवीच्या पुस्तकातील 'समाजातील न्यायपालिकेची भूमिका' यातील न्यायालयातील भ्रष्टाचाराबाबतचा संदर्भ किंवा धडा वगळण्यात येण्याची शक्यता आहे. तसेच या पुस्तकाची बाजारातील विक्री थांबवत एनसीईआरटीने हे पुस्तक बाजारातून पाठिमागे मागवल्याची माहिती समोर आल्याचे वृत्त सूत्रांच्या हवाल्याने माध्यमांनी दिले आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी तीव्र आक्षेप घेतल्यानंतर अखेर या पाठ्यपुस्तकात सुधारणा करण्यात येणार असल्याचे वृत्तात म्हटले आहे.

या पाठ्यपुस्तकाची चर्चा प्रामुख्याने प्रलंबित न्यायालयीन खटले आणि न्यायव्यवस्थेतील कथित भ्रष्टाचार यासारख्या मुद्द्यांवर केंद्रित होती. मात्र, काही निवडक उदाहरणांमुळे न्यायव्यवस्थेच्या कार्यप्रणाली आणि विश्वासार्हतेबद्दल अनपेक्षित किंवा दिशाभूल करणारा संदेश जाऊ शकतो. त्यामुळे आता या पाठ्यपुस्तकात सुधारणा करण्यात येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ज्येष्ठ वकील ए. एम. सिंघवी आणि कपिल सिब्बल यांनी हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर सरन्यायाधीशांनी ही प्रतिक्रिया दिली. मी कोणालाही संस्थेची बदनामी करू देणार नाही, असे सरन्यायाधीश यांनी म्हटले आहे.

## अनुदान थेट शेतकऱ्यांच्या खात्यात देण्याचा केंद्राचा विचार

# दोन लाख कोटींच्या खत अनुदानात आमूलाग्र बदल?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** केंद्र सरकार शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सुमारे दोन लाख कोटी रुपयांच्या वार्षिक खत अनुदान व्यवस्थेत मोठा संरचनात्मक बदल करण्याच्या तयारीत आहे. सध्या हे अनुदान थेट खत उत्पादक कंपन्यांना दिले जाते. परिणामी, बाजारभाव सुमारे २,४०० रुपये असलेली युरियाची पिशवी शेतकऱ्यांना सुमारे २६५ ते २७० रुपयांत उपलब्ध होते.

आता हेच अनुदान थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात 'डायरेक्ट बेनिफिट ट्रान्स्फर' (डीबीटी) पद्धतीने देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांच्या गरजेनुसार खतांची निवड करण्याचे स्वातंत्र्य मिळेल, असा सरकारचा दावा आहे.

दिल्लीतील भारतीय कृषी संशोधन संस्था (पूसा) येथे आयोजित कृषी विज्ञान मेळ्याच्या उद्घाटनावेळी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी हा बदल आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. इतकी मोठी रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाल्यास ते योग्य वेळी आणि आवश्यक त्या प्रमाणात खत खरेदी करू शकतील, असे त्यांनी नमूद केले. सरकारच्या मते, सध्याच्या पद्धतीत अनुदानाचा प्रत्यक्ष परिणाम शेतात कितपत पोहोचतो याबाबत प्रश्न उपस्थित होतात. थेट खात्यात पैसे दिल्यास अनुदानाचा उपयोग अधिक जबाबदारीने होईल आणि पारदर्शकता वाढेल. तज्ज्ञांच्या मते, युरियाच्या अतिरेकी वापराला आळा बसू शकतो आणि संतुलित खतवापरामुळे जमिनीच्या आरोग्यावर सकारात्मक परिणाम होऊ शकतो. किमान आधारभूत किंमत (एमएसपी) अंतर्गत खरेदी प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि वेळबद्ध करण्यावरही सरकार भर देत आहे. अनेक राज्यांत खरेदी प्रक्रिया तीन महिन्यांपर्यंत चालते. लहान शेतकऱ्यांना पिक दीर्घकाळ साठवणे शक्य नसल्याने एका महिन्याच्या आत खरेदी पूर्ण करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. राज्यांशी समन्वय साधून ही अंमलबजावणी केली जाणार आहे.

देयकांमध्ये विलंब झाल्यास संबंधित यंत्रणेला १२ टक्के व्याज देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच केंद्र सरकारचा वाटा थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचाही पर्याय विचाराधीन आहे. या व्यवस्थेमुळे कृषी क्षेत्रातील रोख प्रवाह सुधारेल आणि सावकारांवरील अवलंबित्व कमी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

कृषी यांत्रिकीकरण, ड्रिप आणि स्प्रिंकलर सिंचन, पॉलिहाऊस, ग्रीनहाऊस यांसारख्या तंत्रज्ञानासाठी केंद्र सरकार १८ हून अधिक योजनांद्वारे राज्यांना निधी देते. मात्र अलीकडील आढाव्यांमध्ये काही लाभार्थ्यांपर्यंत उपकरणे पूर्णपणे पोहोचली नसल्याचे आढळले आहे. त्यामुळे अंमलबजावणीत अधिक काटेकोरपणा आणि पारदर्शकतेची गरज अधोरेखित झाली आहे.

कीटकनाशक परवाना प्रणालीही अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्याची तयारी सुरू आहे. गुणवत्तापूर्ण उत्पादने वेगाने बाजारात उपलब्ध व्हावीत आणि बनावट किंवा निकृष्ट उत्पादनांवर आळा बसावा, यासाठी प्रशासन सक्रिय झाले आहे.

# २० मार्चपूर्वी अध्यक्ष व सभापतींची निवडणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या अध्यक्षपद व सभापतीपदाच्या निवडणुका २० मार्चपूर्वी होणार आहेत. ग्रामविकास विभागाने याबाबतचे आदेश जारी केल्याने आता राजकीय घडामोडींना व राजकीय समीकरणाच्या मांडणीला वेग येणार आहे.

राज्यातील १२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत येणा-या १२५ पंचायत समित्यांची निवडणूक ७ फेब्रुवारी रोजी होऊन ९ फेब्रुवारीला निकाल जाहीर झाले आहेत. परंतु जिल्हा परिषद अध्यक्षांची, तसेच पंचायत समित्यांच्या सभापती पदांची निवडणुक कधी होणार याबाबत उत्सुकता होती. अखेर ग्रामविकास विभागाने गुरुवारी याबाबतचे आदेश जारी करून २० मार्चपूर्वी पहिली बैठक घेण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांना दिले आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियम मधील कलम ११(१) व ५९(१) नुसार निवडून आलेल्या सदस्यांचा कार्यकाळ हा पहिल्या बैठकीपासून सुरू होतो.रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, धाराशीव, लातूर आणि परभणी या १२ जिल्ह्यापरिषदांची निवडणूक झाली आहे. यातील अनेक जिल्हा परिषदांमध्ये कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. त्यामुळे महाविकास आघाडी व महायुतीमध्ये सत्तेसाठी वेगवेगळी समीकरणं तयार झाली आहेत.

## संपादकीय

### समन्वयाचा अभाव आणि संघराज्याची कसोटी

**दोन राज्यांच्या पोलिसांतच जर परस्पर संशय, अडवणूक आणि गुन्हे दाखल करण्याची वेळ येत असेल, तर दहशतवादासारख्या गंभीर आव्हानाविरुद्ध एकत्रित लढा कसा उभा राहणार? शिमला-दिल्ली संघर्षाने संघराज्य व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह लावले आहे.**

एआय शिखर परिषदेत 'शर्टलेस निषेध' केल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या युवक काँग्रेस कार्यकर्त्यांना दिल्लीला नेण्यावरून हिमाचल प्रदेश आणि दिल्ली पोलिसांत रंगलेला संघर्ष हा एखाद्या राजकीय नाट्यप्रयोगास साजेसा होता. न्यायालयाकडून ट्रान्झिट रिमांड मिळाल्यानंतरही एक राज्य दुसऱ्या राज्याच्या पोलिसांचे वाहन अडवते, अपहरणाचा गुन्हा दाखल करते, डिजिटल पुराव्यांची मागणी करते आणि काही कर्मचाऱ्यांना मागे ठेवण्याचे निर्देश देते हे चित्र साधे नाही. ते संघराज्याच्या अंतर्गत विश्वासाच्या धाग्यांची झीज दाखवते. घटना वरकरणी किरकोळ. काही कार्यकर्त्यांनी निषेध केला, गुन्हे दाखल झाले, अटक झाली. परंतु अटकेनंतरची कारवाई हा मूळ मुद्दा. दिल्ली पोलिसांनी न्यायालयीन परवानगी घेतल्याचा दावा केला. हिमाचल पोलिसांनी प्रक्रियेवर आक्षेप घेतला. साध्या वेशातील पथक, सीसीटीव्ही जप्ती, वैद्यकीय तपासणी, मध्यरात्री न्यायाधीशांच्या निवासस्थानी हजेरी या सर्व तपशिलांनी वादाला अधिक धार दिली. परिणामी दोन राज्यांच्या पोलिसांनी परस्परांवरच संशय व्यक्त केला. संघराज्य व्यवस्थेत कायदा आणि सुव्यवस्था हा राज्य विषय. परंतु गुन्ह्यांची व्याप्ती सीमारेषा ओलांडते. आरोपी एका राज्यात, गुन्हा दुसऱ्यात, पुरावे तिसरीकडे अशा परिस्थितीत परस्पर सहकार्य अपरिहार्य. यासाठीच ट्रान्झिट रिमांडची तरतूद. एका राज्यातील न्यायालय दुसऱ्या राज्यातील तपासाला तात्पुरती परवानगी देते. ही व्यवस्था विश्वासावर उभी. तोच विश्वास ढासळताना दिसतो. डिजिटल पुराव्यांवरून निर्माण झालेला वाद हे त्याचे उदाहरण. एका बाजूला "कायदेशीर विनंती केल्याशिवाय जप्ती अयोग्य" असा दावा; दुसरीकडे "प्रक्रिया पाळली नाही" असा आरोप. कायद्याच्या व्याख्या न्यायालये ठरवतील. परंतु दोन पोलिस यंत्रणांनी एकमेकांचे वाहन पहाटे अडवणे, गुन्हा दाखल करणे आणि माध्यमांसमोर भूमिका मांडणे ही प्रशासकीय विसंगती. या प्रक्रियेत आरोपींचे अधिकार, पुराव्यांची साखळी आणि न्यायप्रक्रियेची शुचिता या सर्वांवर प्रश्न उभे राहतात. या घटनेचा व्यापक संदर्भ अधिक गंभीर. देश दहशतवाद, अतिरेकी प्रचार, सायबर गुन्हे आणि संघटित गुन्हेगारी यांसारख्या आव्हानांना सामोरे जात आहे. या गुन्ह्यांना भौगोलिक सीमा नसतात. एका राज्यातील अतिरेकी कारवाया दुसऱ्या राज्यातील आर्थिक जाळ्यांशी जोडलेल्या असू शकतात. अशा वेळी जर दोन पोलिस दलांमध्येच समन्वयाचा अभाव असेल, तर राष्ट्रीय स्तरावरील सुरक्षा आराखडे किती परिणामकारक ठरतील? राजकीय पातळीवर या प्रकरणाला रंग चढला. विरोधकांनी राज्य सरकारवर अडथळे निर्माण केल्याचा आरोप केला; सत्ताधाऱ्यांनी प्रक्रियेचे उल्लंघन झाल्याचे म्हटले. ही देवाणघेवाण परिचित. परंतु पोलिस दलांचे राजकीय ध्रुवीकरण ही चिंताजनक बाब. पोलिस हे राज्यसत्तेचे साधन असले तरी त्यांची व्यावसायिक स्वायत्तता आणि परस्पर सहकार्याची क्षमता अबाधित राहिली पाहिजे. अन्यथा प्रत्येक आंतरराज्यीय कारवाई राजकीय शक्तीपरीक्षेत रूपांतरित होईल. संघराज्य व्यवस्थेचे बलस्थान म्हणजे अधिकारांचे विभाजन आणि परस्पर संतुलन. परंतु संतुलनाचे तत्त्व संशयात रूपांतरित झाले, तर व्यवस्था अडखळते. केंद्र आणि राज्ये, तसेच राज्ये परस्पर, यांच्यातील विश्वास हा अदृश्य करार असतो. तो कागदोपत्री नसतो; तो व्यवहारातून जपावा लागतो. या प्रकरणाने तो करार कमकुवत असल्याची जाणीव करून दिली. आंतरराज्यीय समन्वयासाठी आधीच अनेक यंत्रणा अस्तित्वात आहेत संयुक्त कार्यदल, माहिती देवाणघेवाण मंच, गुप्तचर समन्वय गट. परंतु त्या केवळ औपचारिक राहिल्या, तर प्रत्यक्ष कारवाईच्या वेळी अडथळे उभे राहतात. स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांना प्रक्रियेचे स्पष्ट मार्गदर्शन, अधिकारक्षेत्रांची नेमकी आखणी आणि वाद सोडवण्यासाठी त्वरित संवादव्यवस्था आवश्यक. अन्यथा प्रत्येक कृतीनंतर "कोणाचा अधिकार" हा प्रश्न पुढे येतो. या प्रकरणात आणखी एक पैलू लक्षणीय. अटकेनंतर आरोपींना वैद्यकीय तपासणीसाठी नेणे, न्यायालयासमोर हजर करणे, डिजिटल पुरावे सुरक्षित ठेवणे—या सर्व प्रक्रिया कायद्याने ठरवलेल्या. त्या काटेकोर पाळल्या गेल्या असतील, तर वादाला वाव नसावा. पाळल्या नसतील, तर जबाबदारी निश्चित व्हावी. परंतु या सर्व प्रक्रियेवर माध्यमांसमोर आरोप-प्रत्यारोपांची सरबत्ती होणे हे न्यायप्रक्रियेलाच बाधक. दहशतवादविरोधी लढाईचे उदाहरण येथे उपयुक्त. जर एखाद्या राज्यातील संशयित दुसऱ्या राज्यात आश्रय घेत असेल, तर तत्काळ कारवाईसाठी समन्वय हवा. त्या वेळी स्थानिक पोलिसांनी "आम्हाला माहिती नाही" म्हणत अडथळे निर्माण केले, तर परिणाम गंभीर. राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न राजकीय स्पर्धेपेक्षा मोठा असतो. त्यासाठी संस्थात्मक परिपक्वता आवश्यक. या घटनेतून दोन धडे स्पष्ट. पहिला आंतरराज्यीय कारवाईसाठी एकसंध कार्यप्रणाली विकसित करणे अपरिहार्य. दुसरा पोलिस दलांचे व्यावसायिक प्रशिक्षण आणि परस्पर विश्वास वाढवणे तितकेच महत्त्वाचे. राजकीय मतभेद असू शकतात; परंतु कायदा अंमलबजावणी संस्थांनी त्यापलीकडे उभे राहिले पाहिजे. 'शर्टलेस निषेध' हा मूळ विषय असला, तरी त्याने उघड केलेला प्रश्न व्यापक आहे. संघराज्य म्हणजे केवळ अधिकारांची विभागणी नव्हे; ती सहकार्यातील परिपक्वता आहे. दोन राज्यांच्या पोलिसांनी जर एकमेकांवर अपहरणाचे गुन्हे दाखल करायची वेळ आणली, तर सामान्य नागरिकाचा विश्वास डळमळतो. आणि विश्वास हरवला, की कोणतेही राष्ट्रीय धोरण अपुरे ठरते. संघराज्याची ताकद त्याच्या घटकांच्या समन्वयात असते.

# धूसर उद्दिष्टे आणि आखाती सावल्या!

**» अमेरिका-इराण संबंधांचा मागोवा घेणे म्हणजे धुक्यात दिशा शोधण्यासारखे. धमक्या, नौदल तैनाती आणि गुप्त वाटाघाटी यांत वॉशिंग्टन हेलकावे खात आहे. प्रश्न क्षमता नसून हेतूचा आहे. नेमके साध्य काय आणि त्यासाठी मोजावयाची किंमत किती, याचे उत्तर अद्याप धूसर आहे.**



अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव हा नव्या शतकाचा स्थिरांक ठरला आहे. कधी निर्बंध, कधी गुप्त वाटाघाटी, कधी आखातात विमानवाहू नौका. वॉशिंग्टनची भाषा बदलते; परंतु अनिश्चितता कायम राहते. अलीकडील घडामोडींतही हेच चित्र. एका बाजूला दबावाची साधने सज्ज; दुसऱ्या बाजूला ओमान आणि व्हिएन्ना येथे अप्रत्यक्ष संवाद. या द्वंद्वात सर्वाधिक अस्पष्ट घटक म्हणजे अंतिम उद्दिष्ट. धोरणात्मक चर्चांमध्ये गेल्या दशकात इंडो-पॅसिफिकला प्राधान्य देण्याची भाषा होती. चीन हा दीर्घकालीन प्रतिस्पर्धी, अशी मांडणी. तरीही मध्यपूर्वेचे गुरुत्वाकर्षण अमेरिकेला वारंवार खेचते. कारण स्पष्ट आहे. इराणने लेव्हंटपासून लाल समुद्रापर्यंत प्रभावाची साखळी उभी केली. हिजबुल्ला, हमास, हौथी या संघटनांनी पारंपरिक युद्धाशिवाय दबाव निर्माण करण्याची क्षमता दाखवली. ७ ऑक्टोबरनंतर इस्रायलच्या मोहिमेने या जाळ्यांना धक्का दिला; परंतु त्यांचे उच्चाटन झालेले नाही. यामुळे वॉशिंग्टनसमोर प्रश्न उभा राहतो: उद्दिष्ट काय? जर ध्येय मर्यादित असेल प्रतिबंध, तणाव कमी करणे, अणु कार्यक्रमावर नियंत्रण तर दबाव आणि राजनय एकत्र नांदू शकतात. निर्बंध, मर्यादित लष्करी संकेत, आणि संवादाची दारे उघडी ठेवणे हा मार्ग. परंतु जर हेतू राजवट बदलाचा असेल, तर समीकरण पूर्णतः बदलते. इतिहास येथे सावध करतो. दोन आखाती युद्धांची तुलना बोधप्रद आहे. पहिले युद्ध अरुंद राजकीय उद्दिष्टासह कुवेतमधून इराकी सैन्यांची माघार. लष्करी साधने आणि राजकीय ध्येय यांत सुसंगती होती. दुसरे युद्ध विस्तारित ध्येयांसह राजवट बदल, प्रदेशाचे पुनर्रचना. रणांगणावरील जलद विजय दीर्घकालीन अस्थिरतेत रूपांतरित झाला. साधने आणि शेवट यांत तफावत निर्माण झाली, तेथे अडचण सुरू झाली. इराणचा विचार करताना ही शिकवण अधिक महत्त्वाची. इराण हे केवळ एक शासन नाही; ते संस्थात्मकदृष्ट्या खोलवर रुजलेले राष्ट्र आहे. इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्डने असममित युद्धतंत्र आत्मसात केले आहे प्रॉक्सी संघटना, क्षेपणास्त्रे, ड्रोन, सागरी छापामार पद्धती. पारंपरिक लष्करी समतोल साधण्याची त्यांना गरज नाही. राजकीय किंमत वाढवणे पुरेसे. होर्मुझ सामुद्रधुनीतील मर्यादित व्यत्ययही जागतिक बाजारपेठ हलवू शकतो. अशा वेळी निर्णायक प्रतिसादाचा दबाव वाढतो आणि वाढत्या प्रत्येक पायरीने राजनयाची जागा कमी होते. अणु कार्यक्रम या समीकरणात सावलीसारखा आहे. समृद्धीकरणातील प्रगती इराणला सौदेबाजीची ताकद देते. अमेरिकेचे पारंपरिक लष्करी वर्चस्व तिला पर्याय देते. परंतु पर्याय असणे आणि तो वापरणे यात फरक आहे. मोठ्या प्रमाणावर नागरिकांचे दुःख स्वीकारून दीर्घकालीन सुरक्षा साध्य होईल, असे गृहित धरणे धोकादायक. बाह्य दबावाने समाज अनेकदा अधिक कठोर होतो; परिवर्तनाऐवजी संकुचन घडते. याचा अर्थ इराण निर्दोष आहे असा नाही.

प्रादेशिक स्पर्धेत त्यांनी इस्रायलविरोधी संघर्षाचा मार्ग स्वीकारला. सागरी सुरक्षेला आणि नागरी जीवनाला धोका निर्माण करणाऱ्या घटकांना पाठिंबा दिला. इस्रायल इराणी आव्हानाला अस्तित्ववादी मानतो, हे याच पार्श्वभूमीवर. वॉशिंग्टन प्रतिबंधक शक्ती ढासळू देण्यास तयार नाही, हेही समजण्यासारखे. परंतु धोका ओळखणे आणि त्याला लष्करी शक्तीने सहज पुनर्रचित करता येईल, असे मानणे वेगळे. इंडो-पॅसिफिकचा आयाम समीकरण गुंतागुंतीचे करतो.

आखातात प्रत्येक अतिरिक्त तैनाती म्हणजे इतरत्र कमी उपलब्धता. धोरणात्मक केंद्र टिकवायचे असल्यास संसाधनांचे संतुलन आवश्यक. मध्यपूर्वेतील प्रत्येक संकट अमेरिकेचे लक्ष वळवते. दीर्घकालीन प्रतिस्पर्ध्याविरुद्धची तयारी आणि तात्कालिक तणाव व्यवस्थापन यांत ताण वाढतो. सध्याची परिस्थिती उघड युद्धापेक्षा चिंताग्रस्त स्पर्धेसारखी दिसते. कोणताही पक्ष अपरिवर्तनीय युद्धासाठी सज्ज नाही. तेहरानला सहनशक्तीवर विश्वास आहे; वॉशिंग्टनकडे सार्वजनिकरीत्या मांडलेले अंतिम ध्येय स्पष्ट नाही. हीच अनिश्चितता संकट जिवंत ठेवते. रणनीतीचा गाभा धोक्याच्या आकारात नसतो; तो उद्दिष्टाच्या स्पष्टतेत असतो. अमेरिका इराणविरुद्ध किती शक्ती वापरू शकते हा प्रश्न गौण. त्या शक्तीचा उपयोग करून कोणता परिणाम साध्य करायचा आणि कोणत्या किंमतीवर हा मूलभूत प्रश्न. जोपर्यंत त्याचे स्पष्ट उत्तर मिळत नाही, तोपर्यंत धमक्या आणि वाटाघाटी यांचा हा चक्रव्यूह सुरू राहील. आखातातील सावल्या दीर्घ आहेत. त्या सावल्यांतून मार्ग काढण्यासाठी स्पष्टता, संयम आणि साधन-ध्येय सुसंगती आवश्यक. अन्यथा इतिहास पुन्हा एकदा शक्तीच्या अतिरेकाची किंमत वसूल करेल.

## काळानुसार पत्रकारांनी तंत्रस्नेही होणे गरजेचे - प्रा. पाटणकर

### "स्वच्छता हीच खरी सेवा"; उपमहापौर शर्मिला बाबर यांचे प्रतिपादन

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** "कृत्रिम बुद्धिमत्ता ही पत्रकारांच्या नोकऱ्यांसाठी धोका नसून त्यांच्या कामाची गुणवत्ता, अचूकता आणि गती वाढवणारे प्रभावी साधन आहे. बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेत पत्रकारांनी तंत्रस्नेही होणे ही काळाची गरज आहे," असे प्रतिपादन प्रा. सुशोभन पाटणकर यांनी केले.



मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या वतीने चिंचवड येथील ऑटो क्लस्टर सभागृह येथे प्रसारमाध्यम प्रतिनिधींसाठी "पत्रकारिता क्षेत्रात एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञानाचा उपयोग" या विषयावर विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते. महापौर रवि लांडगे, आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या विशेष उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठ येथील माध्यम व जनसंज्ञापन विभागाचे उपसंचालक प्रा. पाटणकर यांनी एआय म्हणजे काय, ते कसे कार्य करते, लार्ज लँग्वेज मॉडेल्स (एलएलएम) यांची संकल्पना आणि प्रभावी प्रॉम्प्ट लेखन पद्धती याविषयी उदाहरणांसह सविस्तर मार्गदर्शन केले. बातमीसाठी आवश्यक माहिती संकलन, विश्लेषण आणि संशोधन प्रक्रिया एआयमुळे अधिक वेगवान होत असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, एआयकडून मिळालेल्या माहितीची पडताळणी करणे आणि संबंधित वाचकवर्ग लक्षात घेऊन अचूक प्रॉम्प्ट तयार करणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी विशेष अधिकारी किरण गायकवाड, ज्येष्ठ पत्रकार विवेक इनामदार, अविनाश चिलेकर आणि नंदकुमार सातुर्डेकर उपस्थित होते.

ज्येष्ठ पत्रकारांनीही एआयच्या जबाबदारीपूर्ण वापराची गरज अधोरेखित करत अशा कार्यशाळा पत्रकारांसाठी उपयुक्त असल्याचे मत व्यक्त केले. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी प्रसारमाध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, तंत्रज्ञानाचा सुजाण वापर करून विश्वासार्ह पत्रकारिता अधिक सक्षम करता येईल, असा आशावाद यावेळी व्यक्त करण्यात आला.

## पिंपरी चिंचवड महापालिकेचा दणदणीत विजय; सलग दहावे अजिंक्यपद

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पुणे आंतर कचेरी असोसिएशनतर्फे आयोजित अंतरकचेरी व्हॉलीबॉल स्पर्धेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकाने पुन्हा एकदा आपला दबदबा सिद्ध करत विजेतेपद पटकावले. १४ व १५ फेब्रुवारी रोजी डेक्कन जिमखाना व्हॉलीबॉल कोर्ट येथे झालेल्या या स्पर्धेत महापालिकेच्या 'अ' आणि 'ब' अशा दोन संघांनी सहभाग घेतला होता. विशेष म्हणजे, महापालिकेने सलग दहाव्या वर्षी अजिंक्यपद मिळवत अभिमानास्पद परंपरा कायम राखली.

अंतिम सामन्यात महापालिका 'अ' संघाने दमदार खेळ करत पुणे शहर पोलीस संघाचा २-० असा पराभव केला. कर्णधार सुहास नाईक, उपकर्णधार दशरथ वाघोले यांच्यासह सहकाऱ्यांनी उत्कृष्ट समन्वय आणि कौशल्य दाखवत विजय निश्चित केला. 'ब' संघानेही चांगली कामगिरी करत चतुर्थ क्रमांक मिळवला. विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सहभाग या विजयाला अधिक व्यापक महत्त्व देणारा ठरला. क्रीडा पर्यवेक्षक दीपक कन्हेरे यांच्या मार्गदर्शनाचा संघाला मोठा फायदा झाला. महापौर रवि लांडगे यांनी सलग दहावे अजिंक्यपद ही शहरासाठी अभिमानाची बाब असल्याचे सांगत खेळाडूंचे अभिनंदन केले. अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनीही कर्मचाऱ्यांच्या क्रीडा क्षेत्रातील सातत्यपूर्ण यशाचे कौतुक केले.

## 'मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण' लाभार्थ्यांसाठी १०% आरक्षण

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पुणे : राज्यातील युवकांना शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचा अनुभव देऊन रोजगारक्षम बनवण्यासाठी २०२४ मध्ये सुरू करण्यात आलेल्या 'मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना'ला आता नवे बळ मिळाले आहे. महाराष्ट्र शासन यांनी या योजनेअंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार पात्र उमेदवारांसाठी मुख्यमंत्री उद्योजकता व नावीन्यता महाफंड मध्ये १० टक्के जागा राखीव ठेवण्यात येणार आहेत. यामुळे उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या युवकांना भांडवली मदत आणि प्रोत्साहन मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

तसेच खासगी कंपन्यांना आवश्यक असलेल्या तात्पुरत्या मनुष्यबळासाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमार्फत विशेष कौशल्य प्रशिक्षण देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) यांच्या माध्यमातून उद्योगांच्या गरजेनुसार अल्पकालीन व लक्षित प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जाणार आहेत.

या निर्णयामुळे प्रशिक्षण घेतलेल्या युवकांची रोजगार मिळवण्याची क्षमता वाढेल, तसेच स्वयंरोजगाराच्या संधींनाही चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## ॲड. सुभाष मोहिते यांची राज्य सहकार धोरण उच्चस्तरीय समितीत निवड

### केंद्रीय सहकार धोरण २०२५च्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या धोरणनिर्मितीत महत्त्वाची जबाबदारी

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पुणे :** केंद्र सरकारने जाहीर केलेल्या केंद्रीय सहकार धोरण २०२५च्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याचे सर्वसमावेशक सहकार धोरण निश्चित करण्यासाठी राज्य शासनाने सहकार मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. या महत्त्वपूर्ण समितीवर सदस्य म्हणून पुणे पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे ज्येष्ठ संचालक व व्यवस्थापन समितीचे विद्यमान अध्यक्ष ॲड. सुभाष मोहिते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सहकार क्षेत्रातील त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाची दखल घेत ही जबाबदारी



त्यांच्यावर सोपविण्यात आल्याचे मानले जात आहे.

ॲड. मोहिते हे सहकार क्षेत्रातील एक अभ्यासू आणि अनुभवी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. त्यांनी पुणे पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष म्हणून यशस्वी नेतृत्व केले असून सध्या ते व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. तसेच पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनचे माजी अध्यक्ष व विद्यमान मानद सचिव म्हणून त्यांनी नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राच्या बळकटीसाठी मोलाचे योगदान दिले आहे. पुणे जिल्हा सहकारी बोर्डाचे संचालक तसेच रामराज्य सहकारी बँकेचे संस्थापक म्हणूनही त्यांची ओळख आहे. गेल्या ५० वर्षांहून अधिक काळ त्यांनी सहकार क्षेत्रात सातत्यपूर्ण कार्य केले आहे. विशेषतः नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रातील प्रशासन, व्यवस्थापन आणि धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. याशिवाय सहकार व कामगार न्यायालयात सुमारे ३६ वर्षे वकील म्हणून काम केल्यामुळे त्यांना कायदेविषयक सखोल ज्ञान व व्यावहारिक अनुभव आहे. राज्याचे नवीन सहकार धोरण आखताना या अनुभवाचा मोठा फायदा होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे, वकील व्यवसायातील व्यक्तीचा प्रथमच या उच्चस्तरीय समितीत समावेश झाल्याने सहकार क्षेत्रात सकारात्मक प्रतिक्रिया उमटत आहेत. ॲड. सुभाष मोहिते यांच्या नियुक्तीमुळे राज्याच्या सहकार चळवळीला नवी दिशा व बळ मिळेल, असा विश्वास सहकार क्षेत्रातील जाणकार व्यक्त करत आहेत.

### पद्मश्री रघुवीर तुकाराम खेडकर यांचा नागरी सन्मान; व्याख्यान, कविसंमेलन व लोककला महोत्सवाचे आयोजन

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पिंपरी-चिंचवडमध्ये सांस्कृतिक जल्लोष

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी:** मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने २५ आणि २७ फेब्रुवारी रोजी विविध सांस्कृतिक, शैक्षणिक आणि वैचारिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मराठी भाषेचे जतन, संवर्धन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून तिचा प्रभाव वाढविणे हा या उपक्रमांचा मुख्य उद्देश असल्याचे महापौर रवि लांडगे यांनी सांगितले.



कार्यक्रमाची सुरुवात बुधवार, २५ फेब्रुवारी रोजी चिंचवड येथील ऑटो क्लस्टर सभागृहात होणार आहे. प्रसार माध्यम प्रतिनिधींसाठी आयोजित विशेष सत्रात "पत्रकारिता क्षेत्रात एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञानाचा उपयोग" या विषयावर सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठाच्या माध्यम व जनसंज्ञापन विभागाचे उपसंचालक प्रा. सुशोभन पाटणकर मार्गदर्शन करणार आहेत. बदलत्या डिजिटल युगात पत्रकारितेची दिशा आणि एआयची भूमिका यावर सखोल चर्चा होणार आहे.

मुख्य कार्यक्रम शुक्रवार, २७ फेब्रुवारी रोजी प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे पार पडणार आहे. सकाळी १० वाजता उद्घाटन समारंभ होईल. या वेळी महाराष्ट्राच्या लोककलेत मोलाचे योगदान दिल्याबद्दल पद्मश्री पुरस्कार जाहीर झालेल्या ज्येष्ठ तमाशा कलावंत Raghuvir Tukaram Khedkar यांचा नागरी सन्मान करण्यात येणार आहे. त्यानंतर ते "तमाशा - मराठी भाषा संवर्धन करणारी महाराष्ट्राची सांस्कृतिक लोकचळवळ" या विषयावर आपले विचार मांडतील.

दुपारी १२ वाजता लोकशाहीर विठ्ठल उमप थिएटर, मुंबई प्रस्तुत "माय मराठीची गौरवगाथा" हा सांस्कृतिक महाकलाविष्कार सादर होणार आहे. यात गायक संदेश विठ्ठल उमप, शाहीर पृथ्वीराज माळी आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा सहभाग असणार आहे. मराठी भाषेचा इतिहास, परंपरा आणि वैभव यांचे दर्शन या कार्यक्रमातून घडणार आहे.

दुपारी ३ वाजता स्थानिक निमंत्रित कवींच्या सहभागातून कविसंमेलन आयोजित करण्यात आले असून त्याचे अध्यक्षपद राज अहेरराव भूषवतील. दुपारी ४ वाजता "अभिजात मराठी भाषेचे वैभव" या विषयावर परिसंवाद होईल. यात इंद्रायणी साहित्य परिषदेचे अरूण बोऱ्हाडे, पिंपरी चिंचवड शहर मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष प्रकाश निर्मल आणि साहित्य अभ्यासक डॉ. धनंजय भिसे सहभागी होणार आहेत. सायंकाळी ६ वाजता "आवाज लोकगीतांचा... गंध मराठी मातीचा..." या लोकगीतांच्या कार्यक्रमात विजय सरतापे, जगदीश गोरसे, विशाल ओव्हाळ, राणी म्हस्के आणि धीरज वानखेडे हे गायक आपली कला सादर करणार आहेत.

या कार्यक्रमांना केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, दत्तात्रय भरणे यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी आणि मान्यवर उपस्थित राहणार आहेत. मराठी भाषेच्या अभिमानाचा जागर करणाऱ्या या कार्यक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## बनावट भरती जाहिरातींपासून सावध रहा; महापालिकेचे नागरिकांना आवाहन

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका मार्फत सध्या कोणत्याही पदासाठी भरती प्रक्रिया सुरू नसल्याचे प्रशासन विभागाने स्पष्ट केले आहे. समाजमाध्यमांवर महापालिकेत विविध पदांसाठी भरती सुरू असल्याचे भासवणाऱ्या खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या जाहिराती, संदेश तसेच बनावट नियुक्तीपत्रे आणि उमेदवारांची यादी प्रसारित होत असल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र, महानगरपालिकेकडून भरती प्रक्रियेबाबत कोणतेही अधिकृत आदेश किंवा सूचना जारी करण्यात आलेल्या नाहीत, असे प्रशासनाने ठामपणे सांगितले आहे.

अलीकडील काही दिवसांत बनावट जाहिरातींच्या माध्यमातून नागरिकांची आर्थिक फसवणूक करण्याचा प्रयत्न होत असल्याच्या तक्रारी प्रशासन विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. काही ठिकाणी महापालिकेच्या नावाचा आणि लोगोचा गैरवापर करून विश्वासार्हतेचा आभास निर्माण केला जात असल्याचेही समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी अशा अप्रमाणित माहितीवर विश्वास ठेवू नये आणि कोणतीही रक्कम भरू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

भरती प्रक्रियेबाबतची सर्व अधिकृत माहिती केवळ महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरच प्रसिद्ध केली जाईल, याची नोंद घ्यावी. इतर कोणत्याही संकेतस्थळ, समाजमाध्यमे किंवा मेसेजिंग ॲपवर प्रसारित होणाऱ्या माहितीवर विश्वास ठेवण्यापूर्वी तिची खातरजमा करणे अत्यावश्यक आहे, असे प्रशासन विभागाचे सहआयुक्त मनोज लोणकर यांनी स्पष्ट केले आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### आठ वर्षीय रीदाचा पहिलाच रमजान उपवास यशस्वी



**पिंपळवंडी** : पिंपळवंडी येथील आठ वर्षीय रीदा इमरान तांबोळी हिने आपल्या आयुष्यातील पहिला रमजानचा रोजा यशस्वीपणे पूर्ण केला. घरातील सदस्यांकडून प्रेरणा घेत तिने ठाम निर्धाराने पहाटे सहेरी करून उपवास सुरू केला. दिवसभर शाळेत हजेरी लावत तिने अन्न-पाण्याविना संयम पाळला आणि सूर्यास्तावेळी इफ्तार करून रोजा पूर्ण केला. कमी वयात दाखवलेल्या या चिकाटीबद्दल शाळेतील शिक्षक, कुटुंबीय व ग्रामस्थांनी तिचे कौतुक केले.

### भिगवण अपहरण प्रकरणाला नवे वळण

**पारगाव :** भिगवण (प्रतिनिधी) दि. २५ : बाजारपेठेतून २१ वर्षीय तरुणीच्या कथित अपहरण प्रकरणाने काही दिवसांपूर्वी जिल्ह्यात खळबळ उडवली होती. लग्नाच्या दोन दिवसांपूर्वी आई-भावासोबत खरेदीहून परतताना मिरचीपूड टाकून अपहरण केल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला होता. घटनेनंतर पुणे–सोलापूर महामार्ग रोखत आंदोलन झाले. दरम्यान, तरुणीने व्हिडिओत "मी स्वेच्छेने गेले" असा दावा करत पोलिसांसमोर हजेरी लावली. न्यायालयीन सुनावणीत सुरुवातीला आईसोबत जाण्यास नकार देणाऱ्या तरुणीने आता आई-मामाकडे जाण्याची तयारी दर्शवली आहे. बदलत्या भूमिकेमुळे प्रकरणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महामार्गालगत खवा केंद्रालाही आग; सीएनजी पंप शेजारील वखारीत भीषण ज्वाला

# शेवाळवाडीत उस पाचटाच्या आगीतून सबस्टेशन जळाले!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर** : शेवाळवाडी (ता. आंबेगाव) गावच्या हद्दीत उसाचे पाचट जाळल्याने लागलेल्या आगीने भीषण रूप धारण करत वीज वितरण कंपनीच्या सबस्टेशनपर्यंत मजल मारली. केबल जळाल्याने परिसरातील वीजपुरवठा तब्बल पाच तास खंडित राहिला. ही आग आटोक्यात येत असतानाच पुणे–नाशिक महामार्गालगत असलेल्या महेश खवा केंद्राच्या लाकडी गोडाऊनला आग लागून ज्वाळांनी उंच उसळी घेतली. शेजारीच सीएनजी गॅस पंप असल्याने मोठ्या दुर्घटनेची भीती निर्माण झाली होती; मात्र Rajgurunagar Fire Brigade यांच्या तत्पर कारवाईमुळे अनर्थ टळला.

**पाचट पेटवले, आग सबस्टेशनपर्यंत**

शेवाळवाडीतील एका शेतकऱ्याने ऊसतोडीनंतर शेतात उरलेले पाचट दुपारी पेटवून दिले. कडक उन्हामुळे परिसरातील गवत पूर्णपणे वाळलेले असल्याने आग झपाट्याने पसरली. शेजारील वीज वितरण कंपनीच्या सबस्टेशनपर्यंत ज्वाळा पोहोचल्या. आत साचलेल्या वाळलेल्या गवतामुळे आग अधिक भडकली आणि केबलचे नुकसान झाले. सुरक्षिततेच्या दृष्टीने पिंपळगाव येथून होणारा वीजपुरवठा तातडीने बंद करण्यात आला.

आगीची माहिती मिळताच मंचर नगरपंचायतीचा पाण्याचा टँकर घटनास्थळी दाखल झाला. उपनगराध्यक्ष लक्ष्मण थोरात, नगरसेवक धनेश मोरडे, सरपंच माधुरी शेटे, उपसरपंच मेघा चिखले, पोलीस पाटील अर्जुन थोरात, विकास शेटे आणि ग्रामस्थांनी आग विझवण्यासाठी प्रयत्न केले. वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने दुरुस्ती हाती घेत पाच तासांत वीजपुरवठा पूर्ववत केला.

**खवा केंद्रात भडकल्या ज्वाला**

सबस्टेशनमधील आग नियंत्रणात येत असतानाच पुणे–नाशिक महामार्गालगतच्या महेश खवा केंद्राच्या लाकडी वखारीत आग लागली. उसाच्या शेतातून सुरू झालेली आग पुढे या गोडाऊनपर्यंत पोहोचल्याचे सांगितले जाते. मोठ्या प्रमाणात लाकूड साठवलेले असल्याने आगीने रौद्र रूप धारण केले. वखारीपासून काही अंतरावर सीएनजी गॅस पंप सुरू होता.

## १५व्या भारतीय छात्र संसदेत ऐश्वर्याची दमदार मांडणी



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** पुणे येथे आयोजित १५व्या भारतीय छात्र संसद अंतर्गत "द भारत कोलोक्वियम" या विशेष सत्रात महाराष्ट्राची कन्या ऐश्वर्या आशा उदयानंद पुरी हिने "५० टक्क्यांवरील आरक्षण : संविधानिक मर्यादांचा प्रश्न" या विषयावर अभ्यासपूर्ण, तर्कसंगत आणि परखड विचार प्रभावीपणे मांडले. देशभरातील विचारवंत, शासक, पत्रकार आणि हजारो विद्यार्थ्यांसमोर केलेल्या या दमदार मांडणीमुळे जुन्नर तालुक्याचा अभिमान उंचावला आहे.

आळेफाटा (ता. जुन्नर) येथील ऐश्वर्याने आपल्या भाषणात आरक्षणाच्या घटनात्मक मर्यादा, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचा संदर्भ तसेच सामाजिक न्याय आणि घटनात्मक संतुलन यांचा सखोल ऊहापोह केला. ५० टक्क्यांपलीकडे जाणारे आरक्षण संविधानाच्या मूलभूत तत्त्वांना बाधा पोहोचवू शकते, असा मुद्दा मांडताना तिने समता, न्याय आणि प्रतिनिधित्व या मूल्यांचा संतुलित विचार मांडला. तिच्या विचारांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. भारतीय छात्र संसद हे व्यासपीठ देशातील युवकांना राष्ट्रीय राजकारणात सहभागाची संधी देणारे प्रेरणादायी मंच म्हणून ओळखले जाते. या व्यासपीठावर माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम आणि रामनाथ कोविंद यांसारख्या मान्यवरांनी मार्गदर्शन केले आहे.

## शिवाजी चाळक यांच्या 'चला अंतराळी जाऊ' बालकविता संग्रहास उल्लेखनीय साहित्यकृती पुरस्कार

### गाडगे महाराज शिक्षण संकुलात विचारजागर; स्वच्छता व मानवसेवेचा संदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपळवंडी** : पुणे महानगरपालिका (मराठी भाषा संवर्धन समिती), यशदा व संवाद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दुसरे राज्यस्तरीय शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलन नुकतेच उत्साहात पार पडले. या संमेलनात पिंपळवंडी (ता. जुन्नर) येथील शिवांजली परिवाराचे प्रवर्तक इंजि. शिवाजी चाळक यांच्या 'चला अंतराळी जाऊ' या बालकविता संग्रहाला बालसाहित्यातील 'उल्लेखनीय साहित्यकृती पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

इंजि. शिवाजी चाळक हे शिवांजली साहित्यापीठाचे संस्थापक असून गेल्या बत्तीस वर्षांपासून मराठी भाषा दिनानिमित्त चाळकवाडी येथे 'शिवांजली साहित्य महोत्सवा'चे आयोजन करत आहेत. साहित्य क्षेत्रातील त्यांच्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत या संमेलनात त्यांना सन्मानित करण्यात आले. 'अर्घ्य' हा त्यांचा पहिला कविता संग्रह प्रकाशित झाला असून त्यानंतर 'उंदराचा टांगा', 'चला पाखरमाया', 'जंगल दंगल', 'अंगात पंगत' आणि 'चला अंतराळी जाऊ' हे पाच बालकविता संग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या बालसाहित्याला अनेक राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. तसेच 'नाणेघाटातील पाऊलखुणा' या प्रतिनिधिक कविता संग्रहाचे संपादनही त्यांनी केले आहे.

या समारंभात सचिन इटकर (महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ अध्यक्ष), शेखर गायकवाड (यशदाचे अतिरिक्त महासंचालक), संवादचे प्रमुख सुनील महाजन, तेलंगणाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक व संमेलनाध्यक्ष महेश भागवत तसेच डॉ. किरण धांडे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यंकटेश कल्याणकर यांनी केले, तर संयोजक राजीव नांदकर यांची विशेष उपस्थिती लाभली.

## डॉ. राहुल पाटील यांची 'नॅशनल मिशन फॉर मेंटरिंग'मध्ये निवड

NCTE–शिक्षण मंत्रालयाच्या राष्ट्रीय पूलमध्ये मार्गदर्शक म्हणून मान्यता; ओतूरसह जुन्नर तालुक्याचा गौरव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर** : भारत सरकारच्या (एनसीटीई) आणि शिक्षण मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या 'नॅशनल मिशन फॉर मेंटरिंग' उपक्रमात डॉ. राहुल प्रतापसिंग पाटील यांची मार्गदर्शक म्हणून निवड झाली आहे. ही माहिती प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट व महाविद्यालय विकास समितीचे सदस्य डॉ. वसंत गावडे यांनी दिली.

डॉ. पाटील हे (पीडीईए) संस्थेच्या अण्णासाहेब वाघेरे कॉलेज, ओतूर येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार देशभरातील शालेय शिक्षकांना उच्च दर्जाचे शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन देण्यासाठी तज्ज्ञांचा 'नॅशनल पूल' तयार करण्यात येत आहे. या महत्त्वाकांक्षी मोहिमेसाठी डॉ. पाटील यांच्या शैक्षणिक योगदानाची व अनुभवाची दखल घेत त्यांची निवड करण्यात आली आहे.



**डिजिटल पोर्टलद्वारे राष्ट्रीय स्तरावर मार्गदर्शन**

या निवडीमुळे डॉ. पाटील आता NMM च्या ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून देशभरातील शिक्षकांशी थेट संवाद साधणार आहेत. अध्यापन पद्धतींमध्ये नवोपक्रम, शैक्षणिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि व्यावसायिक कौशल्यविकास या विषयांवर ते मार्गदर्शन करणार आहेत. शिक्षकांना सक्षम करून शालेय शिक्षणाचा दर्जा उंचावणे हा केंद्र सरकारचा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

**ग्रामीण भागातील महाविद्यालयाचा राष्ट्रीय सन्मान**

डॉ. पाटील यांच्या निवडीमुळे ओतूरसह जुन्नर तालुक्याच्या शैक्षणिक वर्तुळात आनंदाचे वातावरण आहे. ग्रामीण भागातील महाविद्यालयातून राष्ट्रीय स्तरावरील या मोहिमेत प्रतिनिधित्व मिळणे, ही अभिमानाची बाब मानली जात आहे.

या यशाबद्दल महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव अॅड. संदीप कदम, खजिनदार अॅड. मोहनराव देशमुख, सहसचिव एल. एम. पवार, सहसचिव (प्रशासन) ए. एम. जाधव, प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट, उपप्राचार्य डॉ. कल्याण सोनावणे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन व्यक्त केले. "हे यश संस्थेच्या शैक्षणिक परंपरेला मिळालेली राष्ट्रीय ओळख आहे," असे गौरवोद्गार प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट यांनी काढले.

## आंबेगाव तालुका पत्रकार संघाला 'सर्वोत्कृष्ट' सन्मान




वसंतराव काणे आदर्श पत्रकार संघ पुरस्काराने गौरव; कर्जत येथे मान्यवरांच्या हस्ते वितरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुका पत्रकार संघाला यंदाचा 'स्वर्गीय वसंतराव काणे आदर्श पत्रकार संघ' पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे आयोजित समारंभात हा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमास खासदार श्रीरंग बारणे यांची प्रमुख उपस्थिती होती. ज्येष्ठ पत्रकार हेमंत देसाई, आखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद चे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, शरदराव पाबळे व सुनील लोणकर यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

पुणे विभागातील सुमारे साठ तालुक्यांमधून यंदा एकमेव आंबेगाव तालुका पत्रकार संघाची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. संघाचे संस्थापक डी. के. वळसे पाटील, अध्यक्ष संतोष वळसे पाटील आणि डिजिटल मिडियाचे अध्यक्ष सचिन तोडकर यांनी हा सन्मान स्वीकारला.

यावेळी संघाचे प्रताप हिंगे पाटील, रमेश जाधव, डॉ. सुदाम बिडकर, प्रा. अरुण गोरडे, विवेक शिंदे, विकास गाडे, अशोक शेंगाळे, कांताराम भवारी, विशाल करंडे, भरत चिखले, रविंद्र वाळके, सावता झोडगे, लक्ष्मण ढोबळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

या यशाबद्दल तालुक्यातील विविध मान्यवरांनी संघाचे अभिनंदन करत पत्रकारितेतील संघाच्या कार्याची दखल घेतली.

## कांदा दर घसरले; उत्पादक शेतकरी चिंतेत

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यासह पूर्व भागात सध्या कांदा काढणी हंगाम अंतिम टप्प्यात असतानाच बाजारभावात झालेल्या घसरणीमुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. लोणी येथील कांदा लिलावात मोठी आवक झाली असली तरी दर समाधानकारक नसल्याने उत्पादक हवालदिल झाले आहेत. दहा किलोस गोळा कांदा १३५ ते १४० रुपये, साधा कांदा १०० ते १३० रुपये, गोल्टी कांदा ५० ते ९५ रुपये, तर बदला कांदा अवघ्या १५ ते ४५ रुपयांनी विकला जात आहे. लागवड, खते, औषधे, मजुरी आणि काढणी यावर मोठा खर्च करूनही उत्पादन खर्चही निघत नसल्याची खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली. सतत घसरत असलेल्या दरांमुळे पुढील हंगामात कांदा लागवड करावी की नाही, असा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाने हमीभाव, साठवणूक सुविधा आणि निर्यातवाढीसाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

## खामुंडी ते बदगी बेलापूर रस्ता दुरुस्तीला वेग

### ४२ लाखांच्या निधीतून डांबरीकरण; ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळेफाटा :** जुन्नर तालुक्यातील खामुंडी ते बदगी बेलापूर या महत्त्वाच्या ग्रामीण रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाला अखेर गती मिळाली असून सध्या काम प्रगतीपथावर आहे. अनेक वर्षांपासून या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली होती. ठिकठिकाणी पडलेले खड्डे, उखडलेले डांबरीकरण आणि पावसाळ्यात निर्माण होणारा चिखल यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. शालेय विद्यार्थी, शेतकरी तसेच दैनंदिन प्रवास करणाऱ्यांसाठी हा रस्ता डोकेदुखी ठरत होता.

ही समस्या लक्षात घेऊन जुन्नरचे माजी आमदार अतुल बेनके यांनी पुढाकार घेत जिल्हा रस्ते निधीतून तब्बल ४२ लाख रुपयांचा निधी मंजूर करून घेतला. त्यांच्या पाठपुराव्यामुळे रस्त्याच्या दुरुस्ती व नव्याने डांबरीकरणाच्या कामास सुरुवात झाली असून सध्या काम वेगाने सुरू आहे.

कामाची जबाबदारी ओंकार कन्स्ट्रक्शन या संस्थेकडे देण्यात आली आहे. संस्थेचे मालक बाळकृष्ण दिघे स्वतः कामाच्या ठिकाणी उपस्थित राहून पाहणी करत आहेत. रस्ता मजबूत आणि टिकाऊ व्हावा यासाठी उत्कृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यावर विशेष भर दिला जात असल्याची माहिती देण्यात आली.

ग्रामस्थांनी या कामाबद्दल समाधान व्यक्त केले असून "अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न आता मार्गी लागत आहे," अशी भावना व्यक्त केली जात आहे.

रस्ता पूर्ण झाल्यानंतर खामुंडी व बदगी बेलापूर परिसरातील वाहतूक अधिक सुरक्षित व सुलभ होणार आहे. विशेषतः शेतमाल वाहतुकीस मोठा दिलासा मिळणार असून स्थानिक विकासालाही चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, संबंधित ठेकेदारांकडून काम नियोजित वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. हा रस्ता परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

## 'ई-नाम' टाळून मॅन्युअल नोंदींवर आक्षेप; विधान परिषदेत आमदार अमित गोरखे यांचे प्रशासनावर ताशेरे

# पुणे बाजार समितीत पारदर्शकतेसाठी शासन कटिबद्ध

■ दैनिक राज्य लोकतंत्र





**पुणे :** पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे स्पष्ट करतानाच प्रशासकीय दिरंगाईवर विधान परिषदेतील आमदार अमित गोरखे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात जोरदार ताशेरे ओढले. गैरव्यवहार प्रकरणी सात दिवसांत सविस्तर कारवाई अहवाल सादर करण्याचे निर्देश असतानाही अपेक्षित प्रगती का झाली नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

**नियमबाह्य जागा वाटपाचा मुद्दा ऐरणीवर**

आमदार गोरखे यांनी पुणे कृषी उत्पन्न बाजार समिती मधील कथित गैरव्यवहारांकडे सभागृहाचे लक्ष वेधले. तत्कालीन संचालक मंडळाच्या कार्यकाळात स्टॉल्स, टपऱ्या, दुकाने, गाळे, मोकळ्या जागा तसेच पेट्रोल पंपाचे वाटप करताना अनियमितता झाल्याच्या तक्रारी आहेत. मंत्रीस्तरावर निर्देश देऊनही पणन विभागाने संबंधित वाटप रद्द करण्याचे आदेश का दिले नाहीत, असा थेट प्रश्न त्यांनी विचारला. दोषींवर नियमानुसार कारवाई करण्यासाठी प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली.

**'ई-नाम'ला खो, मॅन्युअल नोंदींवर नाराजी**

केंद्र व राज्य सरकारकडून 'नॅशनल अॅग्रीकल्चर मार्केट' (e-NAM) या डिजिटल प्रणालीद्वारे पारदर्शक व्यवहारांवर भर दिला जात असताना पुणे बाजार समितीत अद्याप 'मॅन्युअल' नोंदी ठेवण्याची पद्धत सुरू असल्याबद्दल आमदार गोरखे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. हस्ते नोंदींमुळे त्रुटी व गैरव्यवहारांना वाव मिळू शकतो, त्यामुळे सर्व व्यवहार तातडीने ऑनलाइन प्रणालीवर आणणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

**शेतकऱ्यांच्या निधीकडे दुर्लक्ष?**

नियमानुसार बाजार समितीच्या एकूण उत्पन्नातील किमान ३० टक्के निधी शेतकऱ्यांच्या पायाभूत सुविधांवर खर्च करणे बंधनकारक आहे. मात्र, त्यासाठी सक्तीची अर्थसंकल्पीय तरतूद का केली जात नाही, असा सवाल उपस्थित करत शेतकऱ्यांच्या हक्काच्या निधीवर गदा येत असल्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. बाजार समितीतील कारभार पूर्णतः दोषमुक्त करण्यासाठी आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

**ठोस कारवाईची अपेक्षा**

सलग तीन अधिवेशनांमध्ये हा विषय उपस्थित करूनही निर्णायक कारवाई झालेली नसल्याने शेतकरी, व्यापारी व परवानाधारक घटकांमध्ये असंतोष आहे. शेतमाल खरेदी-विक्रीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या बाजार समितीच्या कामकाजात शिस्त, जबाबदारी व पारदर्शकता अनिवार्य असल्याचे आमदार गोरखे यांनी स्पष्ट केले. येत्या अधिवेशनात चौकशी अहवाल सभागृहात सादर करून ठोस निर्णय घेतला जाईल की केवळ आश्वासनांची पुनरावृत्ती होईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मेंगडेवाडी परिसरात बिबट्याचा वाढता वावर; ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात बिबट्याचा वावर वाढल्याने ग्रामस्थ व शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. लोणी-खेड रस्त्यावरील बागवस्ती घाट, खंडागळे वस्ती, पहाडदरा घाट तसेच धामणी-शिरदाळे घाट परिसरात बिबट्याचे वारंवार दर्शन होत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे.

मेंगडेवाडी (ता. आंबेगाव) येथील गिरे वस्तीमध्ये बुधवारी (दि.२५) पहाटे तीनच्या सुमारास बिबट्याने घरासमोरील पटांगणात झोपलेल्या दहा महिन्यांच्या कुत्र्यावर झडप घालून त्याला भक्ष केले. हा प्रकार माजी सरपंच भरत फल्ले यांच्या घरासमोर घडला. शेजारील दोन कुत्र्यांनी भुंकण्याचा प्रयत्न केला; मात्र तोपर्यंत बिबट्याने कुत्र्याला तोंडात धरून अंधारात धूम ठोकली होती. सकाळी कुत्री का भुंकत होती याचा शोध घेताना फल्ले यांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले असता संपूर्ण घटना कॅमेऱ्यात कैद झाल्याचे दिसून आले. या परिसरात यापूर्वीही बिबट्याचे अनेकदा दर्शन झाले आहे. गिरे वस्ती आणि दांगट वस्ती परिसरात बिबट्या फिरत असल्याच्या तक्रारी वाढल्याने दांगट वस्तीत वनविभागाने पिंजरा लावला आहे. मात्र अद्याप बिबट्या पिंजर्याकडे फिरकलेला नाही, अशी माहिती ग्रामस्थांनी दिली. सध्या भीमाशंकर सहकारी साखर कारखाना व विघ्नहर सहकारी साखर कारखाना यांच्या कार्यक्षेत्रात ऊसतोड अंतिम टप्प्यात आली आहे. ऊसाचे क्षेत्र कमी होत असल्याने बिबट्या ऊसाच्या शेतातून बाहेर पडून डोंगर-दऱ्यांमध्ये आसरा घेत असल्याचा अंदाज शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. झाडाझुडपांचा आडोसा घेत तो वस्त्यांच्या जवळ येत असल्याने धोका वाढल्याची भावना व्यक्त होत आहे.

## सारांश वृत्त

### दिल्ली विमानतळावर २३.९ कोटींचा गांजा जप्त

**नवी दिल्ली:** येथील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील कस्टम अधिकाऱ्यांनी क्राबी (थायलंड) येथून आलेल्या दोन भारतीय प्रवाशांकडून २३.९ किलो संशयित गांजा (गांजा) जप्त केला आहे, ज्याची किंमत अंदाजे २४ कोटी रुपये आहे, असे अधिकाऱ्यांनी गुरुवारी सांगितले. २२ फेब्रुवारी रोजी प्रवासी टर्मिनल ३ वर पोहोचले आणि प्रोफाइलिंगच्या आधारे त्यांना इमिग्रेशन क्षेत्रातील ग्रीन चॅनेलवर रोखण्यात आले.

### युट्यूबरविरुद्ध लूकआउट नोटीस जारी

**हैदराबाद** : हिंदू देवतांबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी केल्याच्या आरोपाखाली दाखल केलेल्या गुन्ह्याप्रकरणी युट्यूबर अन्वेशविरुद्ध लूकआउट नोटीस जारी करण्यात आली आहे, असे पोलिसांनी गुरुवारी सांगितले. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये अभिनेत्री आणि भाजप नेते कराटे कल्याणी यांनी केलेल्या तक्रारीवरून युट्यूबरविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यांनी प्रपंचा यात्रीकुडू म्हणून प्रसिद्ध असलेल्या अन्वेशवर हिंदू समाज, हिंदू धार्मिक श्रद्धा, पूजनीय हिंदू देवता, संस्कृती आणि परंपरांविरुद्ध वारंवार अपमानजनक, बदनामीकारक आणि चिथावणीखोर विधाने केल्याचा आरोप केला होता.

### आंध्रात नदीजोड प्रकल्पाला वेग

**अमरावती**: आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी गुरुवारी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सल्ल्यानुसार, सरकार राज्यातील नदीजोड प्रकल्पावर काम करत आहे. विधानसभेला संबोधित करताना मुख्यमंत्र्यांनी अधोरेखित केले की पंतप्रधान मोदींनी असे निरीक्षण नोंदवले की नद्यांचे आंतरजोडणी साध्य केल्याने राष्ट्रीय पातळीवर नद्यांचे परस्परजोडणी सोपे होईल. मी पंतप्रधानांशी बोललो तेव्हा त्यांनी सांगितले की तुमच्या (आंध्र) राज्यातील सर्व नद्या एकमेकांशी जोडल्या जातील, त्यानंतर राष्ट्रीय पातळीवर जोडणे सोपे होईल.

## केंएसआयआरची अंतिम यादीनंतर सुरक्षेत होणार वाढ

# बंगालमध्ये केंद्रीय दलांच्या 240 कंपन्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता** : विशेष सघन सुधारणा (एसआयआर) ची अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर अवघ्या दुसऱ्याच दिवशी, २८ फेब्रुवारीपासून निवडणुकीच्या उंबरठ्यावर असलेल्या पश्चिम बंगालमध्ये केंद्रीय दलांच्या २४० कंपन्या तैनात करण्यात येणार आहेत. १ मार्चपासून कोलकाता, पूर्व मिदनापूर आणि भारत–बांगलादेश सीमेवरील जिल्ह्यांत क्षेत्रीय वर्चस्व सराव सुरू होणार आहे. त्यानंतर १० मार्चपासून आणखी २४० कंपन्या राज्यात दाखल होतील.

भारतीय निवडणूक आयोगने पहिल्या टप्प्यात तैनात होणाऱ्या जिल्ह्यांची यादी तयार केली आहे. अत्यंत संवेदनशील मानल्या जाणाऱ्या सीमावर्ती उत्तर २४ परगणा जिल्ह्यात सर्वाधिक ३० कंपन्या तैनात केल्या जाणार आहेत. या तुकड्यांमध्ये केंद्रीय राखीव पोलिस दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल, सीमा सुरक्षा दल, भारत-तिबेट सीमा पोलीस आणि सशस्त्र सीमा बल यांचा समावेश असेल.

बांगलादेश सीमेवरील मुर्शिदाबाद जिल्ह्यात १६ कंपन्या तैनात होतील. हावडा आणि दक्षिण २४ परगणा जिल्ह्यांना प्रत्येकी १५ कंपन्या देण्यात येतील. कोलकाता, मालदा आणि नादिया येथे प्रत्येकी १२ कंपन्या तैनात केल्या जातील. उत्तर दिनाजपूरला ११, तर दक्षिण दिनाजपूरला १० कंपन्या मिळतील. याशिवाय दार्जिलिंग, कूचबिहार, पूर्व वर्धमान, पश्चिम वर्धमान, पश्चिम मिदनापूर, पुरुलिया, झारग्राम, अलीपूरद्वार आणि कालिम्पाँग येथेही केंद्रीय दलांची तैनाती होणार आहे. प्रत्येक कंपनीत किमान ७२ सशस्त्र जवान असतील.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, केंद्रीय गृह मंत्रालयने विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर होण्यापूर्वीच एकूण ४८० कंपन्या पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत राज्याच्या मुख्य सचिव नंदिनी चक्रवर्ती, गृह सचिव आणि पोलिस महासंचालकांना कळवण्यात आले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, निवडणुकीच्या तारखा मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात जाहीर होण्याची शक्यता आहे. एप्रिलमध्ये १५ ते ३० दरम्यान तीन टप्प्यांत मतदान होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. निवडणूक प्रक्रियेच्या टप्प्यांची संख्या ही उपलब्ध केंद्रीय दलांवर अवलंबून असते, असेही अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे.

गेल्या वर्षी नोव्हेंबरपासून राज्यात सुरू असलेल्या एसआयआर प्रक्रियेदरम्यान विविध ठिकाणी हिंसाचाराच्या घटना घडल्या. निवडणूक निरीक्षकांच्या वाहनांवर हल्ल्यांच्या तक्रारीही समोर आल्या. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयने गंभीर चिंता व्यक्त केली होती आणि राज्य पोलिस महासंचालक पीयूष पांडे यांना स्थिती अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. तसेच अंतिम मतदार यादी २८ फेब्रुवारीला प्रसिद्ध करण्याचे आदेश आयोगाला देण्यात आले होते.

दरम्यान, राज्य सचिवालय नबन्ना येथील सूत्रांनी सांगितले की अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यानंतर कोणताही तणाव निर्माण होऊ नये यासाठी संवेदनशील भागांत त्वरित केंद्रीय दल तैनात केले जातील. २०२१ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये राज्यात आठ टप्प्यांत मतदान झाले होते आणि त्या वेळी सुमारे ११०० कंपन्या तैनात करण्यात आल्या होत्या. यंदा तुलनेने कमी टप्प्यांत मतदानाची शक्यता वर्तवली जात असली तरी सुरक्षेच्या दृष्टीने व्यापक तयारी सुरू असल्याचे चित्र आहे.

## मोदींचा इन्स्टाग्रामवर १० कोटी फॉलोअर्सचा टप्पा



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इन्स्टाग्रामवर १० कोटी फॉलोअर्सचा टप्पा ओलांडला असून, हा मैलाचा दगड गाठणारे ते पहिले जागतिक नेते आणि राजकारणी ठरले आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

मोदी २०१४ मध्ये इन्स्टाग्रामवर सक्रिय झाले. गेल्या दशकात त्यांचे खाते जागतिक नेत्यांमधील सर्वाधिक प्रभावी आणि आकर्षक डिजिटल व्यासपीठांपैकी एक बनल्याचे निरीक्षण आहे. अधिकृत राजकीय कार्यक्रमांपासून ते सांस्कृतिक उपक्रम आणि वैयक्तिक क्षणांपर्यंत विविध प्रकारची सामग्री त्यांच्या खात्यावर नियमितपणे शेअर केली जाते. मोदींचे इन्स्टाग्राम फॉलोअर्स इतर अनेक नेत्यांपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त आहेत. ट्रम्प यांचे सुमारे ४३.२ दशलक्ष फॉलोअर्स असून मोदींची संख्या त्यापेक्षा दुप्पट आहे. त्यानंतर प्रबोवो सुबियांतो (१५ दशलक्ष), लुईझ इनासियो लुला दा सिल्वा (१४.४ दशलक्ष), रेसेप तय्यिप एर्दोगान (११.६ दशलक्ष) आणि जेवियर मायली (६.४ दशलक्ष) यांचा क्रम लागतो.

मोदींच्या खात्यावर अधिकृत राज्य भेटी, राजनैतिक कार्यक्रम, धोरणात्मक घोषणा, तसेच दैनंदिन कामकाजाशी संबंधित विचार आणि छायाचित्रे यांचा समावेश असतो. छोट्या व्हिडिओ आणि संवादात्मक पोस्टद्वारे त्यांनी नागरिकांशी थेट आणि अनौपचारिक संवाद साधण्याची शैली विकसित केली आहे.

## आयएसआय मुख्यालयाजवळ घरे जमीनदोस्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नुश्की** : पाकिस्तान लष्कराने बलुचिस्तान प्रांतातील नुश्की जिल्ह्यातील काझियाबाद परिसरात, इंटर-सर्व्हिसेस इंटेलिजन्स (आयएसआय) मुख्यालयाजवळील अनेक घरे पाडल्याची माहिती समोर आली आहे. द बलुचिस्तान पोस्टच्या वृत्तानुसार, काही दिवसांपूर्वी रहिवाशांना जागा रिकामी करण्याच्या नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. दिलेल्या मुदतीत घरे खाली न केल्यास ती पाडली जातील, असा इशारा नोटिसांत देण्यात आला होता.

गेल्या काही दिवसांत लष्कराने स्फोटके आणि जड यंत्रसामग्रीचा वापर करून अनेक इमारती जमीनदोस्त केल्या. आयएसआय मुख्यालयाजवळ उभारलेल्या या बांधकामांमुळे संभाव्य सुरक्षाधोका निर्माण होत असल्याचे कारण देत ही कारवाई करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. पाडण्यात आलेल्या इमारतींपैकी एक घर बलुचिस्तान लिबरेशन आर्मीचे नेते बशीर झेब बलोच यांचे वडिलोपार्जित घर असल्याचा दावा करण्यात आला आहे. याशिवाय काही इतर राजकीय व्यक्तींशी संबंधित घरेही कारवाईत उद्ध्वस्त करण्यात आल्याचे वृत्त आहे. अलीकडे बीएलएने हाती घेतलेल्या 'ऑपरेशन हेरफ'नंतर ही मोहीम वेगाने राबवली गेल्याचे मानले जाते.

नुश्कीच्या काझियाबाद भागात दररोज संध्याकाळी ६ नंतर कर्फ्यू लागू करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. सुरक्षा दलांनी रहिवाशांना पाकिस्तानच्या समर्थनार्थ रॅली काढण्यास आणि घरांवर पाकिस्तानी झेंडे फडकवण्यास सांगितल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. तसे न केल्यास कर्फ्यू कायम ठेवला जाईल, असा इशारा दिल्याचेही सांगण्यात येत आहे. ३१ जानेवारी रोजी बीएलएने अनेक शहरांत समन्वित हल्ले सुरू केल्यापासून परिस्थिती अधिक तणावपूर्ण बनली आहे. त्या कारवायांमध्ये पाकिस्तानी सुरक्षा दलांचे मोठे नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला होता.

## इराणवर पहिल्या हल्ल्याची रणनीती तयार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वॉशिंग्टन** : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या काही वरिष्ठ सल्लागारांनी इस्रायलने इराणवर पहिला हल्ला करावा, अशी भूमिका घेतल्याचा दावा पॉलिटिकोच्या अहवालात करण्यात आला आहे. या हालचालीमुळे भविष्यात अमेरिकेला लष्करी कारवाईसाठी अधिक अनुकूल राजकीय वातावरण तयार होईल आणि अमेरिकन मतदारांचा पाठिंबा मिळवणे सोपे जाईल, असा या रणनीतीमागील विचार असल्याचे सूत्रांनी नमूद केले आहे.

अहवालानुसार, ट्रम्प प्रशासनातील काहींचे मत आहे की इस्रायलने एकट्याने कारवाई करून सुरुवात केल्यास आणि त्यानंतर इराणने अमेरिकेवर किंवा तिच्या हितसंबंधांवर प्रत्युत्तर दिल्यास, वॉशिंग्टनकडे थेट युद्धात उतरण्याचे ठोस कारण उपलब्ध होईल. अमेरिका किंवा तिच्या मित्रदेशावर प्रथम हल्ला झाल्याचे चित्र उभे राहिले, तर इराणविरुद्ध व्यापक लष्करी कारवाईला जनतेचा मानसिक आणि राजकीय पाठिंबा अधिक सहज मिळू शकतो.

तथापि, संभाव्य युद्धाच्या पार्श्वभूमीवर गंभीर धोरणात्मक जोखमींचे मूल्यांकनही केले जात आहे. इराणशी संघर्ष झाल्यास अमेरिकेच्या शस्त्रास्त्र आणि दारूगोळा साठ्यावर मोठा ताण येऊ शकतो. अशा परिस्थितीचा फायदा घेत चीन तैवानविरुद्ध लष्करी कारवाई करू शकतो, अशीही भीती व्यक्त होत आहे. याशिवाय, मध्यपूर्वेतील अमेरिकन लष्करी तळ इराणच्या हल्ल्याच्या टप्प्यात येऊ शकतात. इस्रायलची हवाई संरक्षण प्रणाली आयर्न डोम सर्व अमेरिकन तळांचे संरक्षण करू शकत नाही. संघर्ष 'राजवट बदल' पातळीवर गेला, तर इराण पूर्ण क्षमतेने प्रत्युत्तर देऊ शकतो आणि त्यात अमेरिकन सैनिकांचे जीव धोक्यात येऊ शकतात. हा ट्रम्प यांच्यासाठी गंभीर राजकीय धोका ठरू शकतो, असे सूत्रांचे मत आहे. या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची जिनिव्हा येथे ट्रम्प यांचे राजदूत स्टीव्ह विटकॉफ आणि जेरेड कुशनर यांची भेट घेणार आहेत. ही बैठक अत्यंत निर्णायक मानली जात आहे.

जिनिव्हाला रवाना होण्यापूर्वी अराघची यांनी स्पष्ट इशारा दिला की इराण आपला शांततापूर्ण अणुकार्यक्रम कोणत्याही परिस्थितीत सोडणार नाही. अमेरिकेने हल्ला केल्यास अरब देशांतील अमेरिकन लष्करी तळ कायदेशीर लक्ष्य ठरतील आणि त्यांच्यावर कोणताही संकोच न करता कारवाई केली जाईल, असा त्यांनी इशारा दिला.

## पीएलआय योजनेवरून अमेरिका-चीन आक्रमक

■ दैनिक राज्य लोकतंत्र


**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भारताला "जागतिक उत्पादन महासत्ता" बनवण्याचे उद्दिष्ट सध्या आंतरराष्ट्रीय व्यापार वादाच्या केंद्रस्थानी आले आहे. अमेरिका आणि चीनने भारतावर जागतिक व्यापार नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप करत विविध पावले उचलली आहेत. मात्र या कारवाईमुळे जागतिक स्तरावर दुहेरी निकषांचा मुद्दा चर्चेत आला आहे.

या वादाचा केंद्रबिंदू म्हणजे भारताची उत्पादन-संबंधित प्रोत्साहन योजना. २०२० मध्ये सुरू करण्यात आलेली ही योजना एकूण १.९१ लाख कोटी रुपयांची असून इलेक्ट्रॉनिक्स, औषधनिर्माण, सौर मॉड्यूल, ऑटोमोटिव्ह आणि वैद्यकीय उपकरणे अशा १४ क्षेत्रांना लागू आहे. या योजनेअंतर्गत देशांतर्गत उत्पादन वाढवण्यासाठी निवडक कंपन्यांना प्रोत्साहन दिले जाते. वारी एनर्जी, अदानी एंटरप्रायझेस आणि रिलायन्स इंडस्ट्रीजसारख्या कंपन्यांना या धोरणाचा लाभ झाल्याचे म्हटले जाते. अमेरिकेने अलीकडेच भारतीय सौर पॅनल आयातीवर १२६ टक्के प्रारंभिक शुल्क लादले. भारत आपल्या उत्पादन क्षेत्राला अन्याय्य अनुदान देत असल्याचा अमेरिकेचा आरोप आहे. हा उच्च दर भारतीय सौर कंपन्यांना अमेरिकन बाजारपेठेतून बाहेर ठेवण्याच्या उद्देशाने लावण्यात आला आहे. जागतिक व्यापार संघटनेने चीनच्या तक्रारीवरून एक पॅनेल स्थापन केले आहे. चीनचा आरोप आहे की भारताच्या ऑटोमोटिव्ह आणि अक्षय ऊर्जा क्षेत्रातील प्रोत्साहन योजनांमुळे आयात केलेल्या चिनी उत्पादनांपेक्षा देशांतर्गत वस्तूंना प्राधान्य दिले जाते. मात्र, भारतावर टीका करणाऱ्या दोन्ही देशांच्या धोरणांवरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

## डिजिटल प्लॅटफॉर्मनी कंटेंटची जबाबदारी घ्यावी

# ऑनलाइन सुरक्षेबाबत इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली** : डिजिटल प्लॅटफॉर्मनी त्यांच्या होस्टिंग असलेल्या कंटेंटची स्पष्ट जबाबदारी स्वीकारली पाहिजे आणि मुलांसह सर्व नागरिकांची ऑनलाइन सुरक्षितता सुनिश्चित करणे हे त्यांचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी गुरुवारी केले.

येथे डिजिटल न्यूज पब्लिशर्स असोसिएशन कॉन्क्लेव्हमध्ये बोलताना वैष्णव यांनी प्लॅटफॉर्मना "जागे" होण्याचे आवाहन केले. हजारो वर्षांपासून मानवी समाजाने उभारलेल्या संस्थांवरील विश्वास दृढ ठेवण्याची जबाबदारी तंत्रज्ञान कंपन्यांवरही आहे, असे ते म्हणाले.

"प्लॅटफॉर्मनी त्यांच्या माध्यमातून प्रसारित होणाऱ्या कंटेंटची जबाबदारी घेतली पाहिजे. मुलांची आणि सर्व नागरिकांची ऑनलाइन सुरक्षा ही त्यांची थेट जबाबदारी आहे," असे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. या मूलभूत तत्त्वांचे पालन न केल्यास संबंधित प्लॅटफॉर्मना जबाबदार धरले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

इंटरनेटचे स्वरूप झपाट्याने बदलत असल्याचे नमूद करत वैष्णव यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता निर्मित सामग्रीच्या नियमनाची गरज अधोरेखित केली. एखाद्या व्यक्तीचा चेहरा, आवाज किंवा व्यक्तिमत्त्व वापरून सामग्री तयार करताना संबंधित व्यक्तीची संमती आवश्यक असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. "मोठा बदल घडवून आणण्याची वेळ आली आहे. समाजाने मागणी केलेल्या या बदलाचा आदर प्लॅटफॉर्मनी केला पाहिजे," असे ते म्हणाले.

मानवी समाज संस्थांवरील विश्वासावर उभा आहे, असे सांगताना त्यांनी कुटुंब, सामाजिक रचना, न्यायपालिका, माध्यमे आणि कायदेमंडळ यांचा उल्लेख केला. माध्यमांची विश्वासार्हता निष्पक्षता, प्रकाशनापूर्वीची पडताळणी आणि मजकुराबाबतची जबाबदारी यांवर अवलंबून असते, असे त्यांनी नमूद केले.

डीपफेकसारख्या नव्या तंत्रज्ञानामुळे कधीही न घडलेल्या घटनांवर लोकांचा विश्वास बसू शकतो, ही गंभीर बाब असल्याचेही त्यांनी सांगितले. तंत्रज्ञानाच्या या बदलत्या युगात विश्वासाचा मूलभूत सिद्धांत टिकवून ठेवण्यासाठी स्पष्ट नियम आणि उत्तरदायित्व आवश्यक असल्याचे वैष्णव यांनी अधोरेखित केले.

## 'ट्रम्प यांनी एपस्टाईनच्या आधारे मोदींना धमकावले'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कन्नूर** : राहुल गांधी यांनी गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर गंभीर आरोप करत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'एपस्टाईन फाइल्स'चा वापर करून भारत-अमेरिका व्यापार करारावर दबाव आणल्याचा दावा केला. या करारामुळे भारतीय शेतकऱ्यांचे 'बलिदान' दिले जात असल्याचेही त्यांनी म्हटले. लोकसभेतील विरोधी पक्षनेते कन्नूर जिल्ह्यातील पेरावूर येथे आयोजित शेतकरी परिषदेत बोलत होते.

गांधी म्हणाले की, शेतकरी हा भारताचा पाया आहे, मात्र सरकारला ही साधी गोष्ट समजलेली नाही. "आयटी आणि इतर क्षेत्रांवर भाषणे दिली जातात, पण पाया मजबूत नसल्यास काहीही उभे राहू शकत नाही. आपण दररोज अन्न खातो, पण ते आपल्या टेबलावर कोण ठेवते हे विसरतो," असे ते म्हणाले. त्यांनी आरोप केला की, पंतप्रधानांनी अमेरिकन राष्ट्राध्यक्षांसोबत असा करार केला आहे जो "पाया खोदण्यासारखा" आहे. गांधींच्या मते, भारतीय शेतकरी लहान भूधारक असून त्यांचे यांत्रिकीकरण मर्यादित आहे, तर अमेरिकन शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणावर जमीन व प्रगत यांत्रिकीकरण आहे. अशा परिस्थितीत अमेरिकन शेतकऱ्यांना भारतात सोयाबीन, मका आणि फळे विक्रीस परवानगी देणे हे "गुन्हेगारी कृत्य" ठरेल, असे त्यांनी म्हटले. हरित आणि श्वेत क्रांतीमुळे भारताचा कृषी पाया मजबूत झाला, मात्र हा पाया आता कमकुवत केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

गांधी यांनी यावेळी असा आरोप केला की, भारत-अमेरिका करार चार महिन्यांपासून रखडला होता कारण शेती क्षेत्र उघडण्यावर मतभेद होते. "अमेरिकन राष्ट्राध्यक्ष पंतप्रधानांना धमकावत होते," असा आरोप त्यांनी केला. संसदेतील राष्ट्रपतींच्या अभिभाषणानंतर बोलण्याची संधी नाकारण्यात आल्याचा आरोप करत गांधी म्हणाले की, ते दोन मुद्दे उपस्थित करणार होते. "सुमारे ३.५ दशलक्ष 'एपस्टाईन फायली' अद्याप जाहीर झालेल्या नाहीत आणि त्यात भारताच्या पंतप्रधानांबद्दल माहिती आहे," असा दावा त्यांनी केला. तसेच अमेरिकेतील अदानी प्रकरणाचा उल्लेख करत त्यांनी उद्योगपती गौतम अदानी यांच्याविरोधातील कारवाईचा संदर्भ दिला.

## हापूरमध्ये बांगलादेशी महिलेविरुद्ध गुन्हा

**हापूर** : बनावट ओळखपत्रांच्या आधारे भारतीय कागदपत्रे मिळवून स्थानिक तरुणाशी विवाह केल्याच्या आरोपावरून बांगलादेशी नागरिक महमुदा बेगम हिच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महमुदा बेगम ३ फेब्रुवारी २०२१ रोजी तीन महिन्यांच्या व्हिसावर भारतात आली होती. व्हिसाची मुदत संपल्यानंतरही ती बेकायदेशीरपणे वास्तव्यास होती. 'बेगम राणी' या नावाने बनावट कागदपत्रे तयार करून स्थानिक नागरिकत्वाशी संबंधित दस्तऐवज मिळवले.

## 'द केरळ स्टोरी २'च्या प्रदर्शनाला केरळ उच्च न्यायालयाची स्थगिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**कोची** : केरळ उच्च न्यायालय यांनी गुरुवारी 'द केरळ स्टोरी २ – गोज बियॉन्ड' या चित्रपटाच्या प्रदर्शनाला अंतरिम स्थगिती दिली. चित्रपटाला प्रमाणपत्र देताना सेन्सॉर बोर्डाने आवश्यक विचार केला नसल्याचे प्रथमदर्शनी दिसत असल्याचे न्यायालयाने नमूद केले. चित्रपटाच्या प्रदर्शनाला आव्हान देणाऱ्या दोन याचिकांवर न्यायमूर्ती बेचू कुरियन थॉमस यांनी हा आदेश दिला. संबंधित चित्रपट २७ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होणार होता.

न्यायालयाने आदेशात स्पष्ट केले की, चित्रपटामुळे सामाजिक सौहार्द बिघडू नये यासाठी घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळ (सीबीएफसी) यांनी केल्याचे दिसत नाही. याचिकाकर्त्यांनी चित्रपटातील आशय समाजात तणाव निर्माण करू शकतो, असा दावा करत प्रदर्शनाला स्थगिती देण्याची मागणी केली होती. प्राथमिक सुनावणीनंतर न्यायालयाने चित्रपटाच्या प्रदर्शनावर तात्पुरती रोक लावत पुढील सुनावणीपर्यंत स्थिती कायम ठेवण्याचे निर्देश दिले.

या निर्णयामुळे चित्रपटाच्या नियोजित प्रदर्शनावर अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले असून, पुढील सुनावणीकडे चित्रपटसृष्टीचे लक्ष लागले आहे.

## युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना अटक करण्यावरून जुंपली

# शिमला- दिल्ली पोलिसांमध्ये २४ तासांचा थरार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिमला** : एआय समिटमध्ये 'शर्टलेस निषेध' केल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या तीन युवक काँग्रेस कार्यकर्त्यांना दिल्लीला घेऊन जाण्यावरून शिमला आणि दिल्ली पोलिसांमध्ये तब्बल २४ तास नाट्यमय संघर्ष रंगला. गुरुवारी सकाळी दिल्ली पोलिसांच्या पथकाला अखेर राष्ट्रीय राजधानीकडे रवाना होण्याची परवानगी मिळाल्यानंतर हा तणाव निवळला.

दिल्ली पोलिसांनी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी (एसीजेएम) यांच्याकडून ट्रान्झिट रिमांड मिळवला असतानाही शिमला पोलिसांनी त्यांना सुमारे पाच तास रोखून धरल्याने वातावरण चिघळले होते. बुधवारी संध्याकाळी हिमाचल प्रदेश पोलिसांनी दिल्ली पोलिस कर्मचाऱ्यांविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करत शोगी सीमेवर त्यांची वाहने अडवली.

रोहरू उपविभागातील चिरगाव परिसरातून ताब्यात घेतलेल्या तिन्ही युवक काँग्रेस सदस्यांना रात्री उशिरा शिमलातील दीनदयाळ उपाध्याय झोनल हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय तपासणीसाठी नेण्यात आले. त्यानंतर पहाटे १.३० वाजता त्यांना एसीजेएम एकांश कपिल यांच्या निवासस्थानी हजर करण्यात आले. न्यायालयाने ट्रान्झिट रिमांड मंजूर केल्यानंतर दिल्ली पथक पुन्हा रवाना झाले. मात्र गुरुवारी पहाटे कानलोग परिसरात त्यांना पुन्हा रोखण्यात आले. आरोपींसह एका पथकाला दिल्लीला जाण्यास सांगण्यात आले.

रोहरू येथील अटकेदरम्यान जप्त केलेल्या डिजिटल पुराव्यांची प्रत देण्याची मागणी शिमला पोलिसांनी केली. दिल्ली पोलिसांनी आरोपींची सुरक्षा ही त्यांची जबाबदारी असल्याचे सांगत कोणताही सदस्य मागे सोडण्यास नकार दिला. शोगी सीमेवर पहाटे ४ वाजता पुन्हा एकदा दिल्ली पोलिसांचे वाहन अडवण्यात आले. या वाहनात सीसीटीव्ही फुटेज, संबंधित कागदपत्रे आणि शस्त्रे असल्याचा दावा दिल्ली पोलिसांनी केला. जप्ती मेमो सादर केल्यानंतरच हा गोंधळ शांत झाला. डिजिटल पुरावे मात्र देण्यात आले नाहीत.

दिल्ली पोलिसांचे एसीपी राहुल विक्रम यांनी स्पष्ट केले की, शिमला पोलिसांना कायदेशीररित्या डिजिटल पुरावे किंवा वाहन जप्त करता येणार नाही. आवश्यक असल्यास लेखी विनंती करावी लागेल, असेही त्यांनी सांगितले. आरोपींचे वकील संदीप दत्ता यांनी अटकेदरम्यान योग्य प्रक्रिया पाळली नसल्याचा आरोप करत ट्रान्झिट रिमांडला विरोध केला. दिल्ली पोलिसांचे वकील नंद लाल यांनी न्यायालयाने विधिवत रिमांड मंजूर केल्याचे सांगितले.

शिमला पोलिसांनी निवेदनात म्हटले की, रोहरूतील एका रिसॉर्टमधून साध्या वेशातील १५-२० जणांनी तिघांना जबरदस्तीने नेले आणि सीसीटीव्ही यंत्रणाही पावतीशिवाय जप्त केली. दुसरीकडे, दिल्ली पोलिसांनी आवश्यक कागदपत्रे दाखवून कारवाई केल्याचा दावा केला.

हिमाचल प्रदेश विधानसभेतील विरोधी पक्षनेते जय राम ठाकूर यांनी राज्य सरकारवर टीका करत आंतरराज्यीय कारवाईत अडथळे निर्माण केल्याचा आरोप केला. मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू यांच्यावर 'अराजकतेचे राजकारण' केल्याची टीकाही त्यांनी केली.

दरम्यान, २० फेब्रुवारी रोजी भारत मंडपम येथे झालेल्या निषेधानंतर दिल्ली पोलिसांनी भारतीय न्याय संहितेअंतर्गत दंगल आणि वैमनस्य पसरवण्यासारखे गुन्हे दाखल केले आहेत. या प्रकरणात भारतीय युवा काँग्रेसचे अध्यक्ष उदय भानू चिब आणि माजी राष्ट्रीय प्रवक्ते भूदेव शर्मा यांनाही अटक करण्यात आली असून त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.